# महार



लेखक – [illegible] बी.ए.

REFBK-0010538
सं. नं.

षा भारती प्रकाशन, कुर्ला, मुंबई नं. ३

# महाराष्ट्राचा महार

## ( भाग पहिला )

## प्राचीन इतिहास

**महार हें एक राष्ट्र होतें....ती एक स्वतंत्र संस्कृति होती !**

ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रमांक २५७२ दि: ........
क्रमांक ६१० नोंद १५।४५

: लेखक :

श्री. वि. तु. जाधव, बी. ए. (ऑनर्स)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 2043


उषा भारती प्रकाशन

REFBK-0010538

किंमत ८ आणे

मुखपृष्ठावरील दुरंगी चित्र महार ज्ञातींतील एक उदयोन्मुख चित्रकार
श्री. एस्. जे. पालवे यांनीं काढलें आहे.

प्रथमावृत्ति डिसेंबर १९५६

सर्व हक्क सौ. रजनी विठ्ठल जाधव यांचें स्वाधीन

: प्रकाशक :

**श्री. के. मा. सोनवणे**
व्यवस्थापक, उषाभारती प्रकाशन
कासीम हाऊस, सीं. एस्. टी. रोड
कुर्ला, मुंबई नं. ३७

: मुद्रक :

**श्री. कृ. ना. सापळे,**
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
मोरबाग रोड,
दादर, मुंबई नं. १४

महाराष्ट्राच्या तेजस्वी महार समाजांत जन्म घेऊन अखिल भारतीय
दलितांचा भाग्योदय घडवून आणणारे
युगपुरुष



महापरिनिर्वाणगत

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

यांच्या

**पुण्यस्मृतीस**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०५३

# —आणि असें घडेल तर....!

दीड हजार वर्षांनंतर महाराष्ट्राचा महार डॉ. बाबासाहेबांच्या दिव्य संदेशानुसार बौद्ध–धर्म स्वीकारीत आहे. हा दीड हजार वर्षांचा काळ म्हणजे एक दीर्घ काळ-रात्रच होती. या अंधाऱ्या रात्रींत आम्ही हिंदुधर्माच्या खोट्या भूलथापांना भाळलों व ब्राह्मणी धर्माची अखंड गुलामगिरी पत्करली. कदाचित् एका काळीं बुद्धाच्या शिकवणीनें पूनीत झालेला महार पुनः बुद्धमार्गानें जाणार असला तरी गेलीं दीड हजार वर्षें त्यानें ज्या दारुण अवस्थेंत काढलीं त्याची ऐतिहासिक नोंद आपल्या संग्रहीं नको का ? हिंदुधर्माची गुलामगिरी कांहीं साधीसुधी नव्हती. ती मगरमिठी होती. या मगरमिठींतून बाहेर पडण्यासाठीं महारांनीं केलेली धडपड मोठ्या रोमहर्षक प्रसंगानीं भरलेली आहे.

'महाराष्ट्राचा महार' गेल्या पांच वर्षांत माझ्या डोक्यांत सारखा गलका करून आहे. महाराष्ट्रांत किंवा महाराष्ट्राच्या महार जातींतील माझा जन्मयोग म्हणूनच कांहीं नव्हे ! पण इतर अनेक कारणांस्तव महारांचा इतिहास मराठी भाषेंत लिहिला जावा या आकांक्षेनेंच मी महारांच्या इतिहासाचे धागेदोरे शोधीत आहे. त्यांची वीण कशी झाली आहे हें ठरविण्याचा अधिकार वाचकांसच आहे. ज्यांना महार जात हीन म्हणून त्याज्य वाटते त्यांना यांतील स्वारस्य कळणार नाहीं. पण महार जातीची पराक्रमी आणि स्वाभिमानी परंपराच हा इतिहास लिहिण्यास मला उद्युक्त करीत आहे. हा इतिहास धुंडतांना आपलेपणाच्या उर्मि माझ्या मनांत उफाळतात. एक नवीन चेव येऊं लागतो; अन् वाटतें माझ्या महार जातीचा मध्ययुगीन आणि अर्वाचीन इतिहास अधिकाधिक त्वरेनें माझ्या वाचकांपुढें आणावा. माझी ही

महत्त्वाकांक्षा सफल झाली तर मी या प्राचीन इतिहासासारखेच आणखी चार किं पांच विभाग क्रमशः या प्रकाशनातर्फे सादर करण्याचें योजिलें आहे आणि भविष्यांत कधीं शक्य झालें तर त्याचा एकच ग्रंथ वाचकांच्या हातीं द्यावयाचे मानस आहे. मध्ययुगीन व अर्वाचीन कालखंडांतील ही तेजस्वी प्रकरणें ज्या दिवशीं मी माझ्या वाचकांपुढें आणीन तो भाग्यदिनच ! आणि असें घडलें तर माझ्या ज्ञाति–ऋणांतून मी मुक्त झालों असेंच मला वाटेल.

प्राचीन इतिहासास आधारभूत झालेला डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा अमोल सिद्धांत या पुस्तिकेंत पुनर्मुद्रित करण्यास उदार अंतःकरणानें परवानगी दिल्याबद्दल डॉ. केतकर यांच्या सुविद्य कन्या सौ. वेरा शर्मा आणि त्यांच्या पत्नी श्रीमती शीलावती केतकर यांचा मी अत्यंत आभारी आहे.



... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २९८९४ विः ३/लिहि
क्रमांक ६८० नों: दि. २९/५/५

# महाराष्ट्राचा महार

## झाला महार पंढरीनाथ !

**म**हार....महाराष्ट्राचा महार! हिंदु धर्माच्या अघोरी जातिभेदनीतीमुळें अस्पृश्य बनलेला पण महाराष्ट्राला ललामभूत असलेला महार आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत वसाहत करून आहे. खरेंच, तो वसाहत करून आहे का इतर महारेतर त्याच्याभोंवतीं वसाहत करून राहिले आहेत ? इतिहासकारांनांही पडलेलें हें एक कोडें आहे. इतिहाससंशोधकानांही हतबुद्ध करणारा हा महाराष्ट्राचा महार एरव्हीं आहे तरीं कसा ? एका आधुनिक कवीच्या शब्दांत त्याचें सर्वसामान्य चित्र हें असें आहे:—

झाला महार पंढरीनाथ,
काय देवाची सांगूं मात !
**नेसला मळीण चिंगोटी, घेतली हातांमध्यें काठी**
**घोंगडी टाकिली पाठीं, करी जोहार दरबारांत**
झाला महार पंढरीनाथ !
**मुंडाशांत बांधली चिठी, फेंकतो दूरून जगजेठी**
दामाजीनें विकली जी कोठी त्याचं घ्यावं नाणं पदरांत
झाला महार पंढरीनाथ !
खळखळा ओतिल्या मोहरा, याची मोजून पावती करा
ढीग बघून चमकल्या नजरा, शाह घाली बोट तोंडांत
झाला महार पंढरीनाथ !

दामाजीला दुष्काळासारख्या आपत्तींत यःकश्चित् महार मदत करर हें स्पष्टपणें सांगणें हिंदुसवर्णीयानां लाजिरवाणें वाटलें. केवळ महाराच्य उपकारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करणें त्यांच्या धर्ममूल अहंभावाला न रुचल्यामुळेंच विठू महाराला 'पंढरीनाथ' करून टाकला आणि एका ऐतिहासिक सत्याची दंतकथा बनविली. वरील कवितेंतील महाराचें वर्णन हेंच आजवरचें महाराचें लौकिक स्वरूप आहे. या पलिकडे महार कांहीं असूं शकेल असें बहुसंख्य सवर्ण हिंदूनां तरी वाटत नाहीं. किंबहुना, त्याची खरीखुरी ओळख करून घेण्याइतका मनाचा उदारपणा त्यांनीं गेल्या दीडहजार वर्षांत एकदांही दाखविला नाहीं. त्यांच्या ह्या अनुदार-पणामुळेंच महार वरील वर्णनाचा बनला आहे.

## हें चित्र खोटें आहे

त्याची ती चिंगोटी, फाटकें मुंडासें व हातांतील काठी ही त्याच्या मध्ययुगीन गुलामगिरीच्या स्थितीचें द्योतक आहे. परंतु त्या कवीला त्याचा उदारपणा, त्याची कर्तृत्वशील 'मात' पंढरीनाथाच्या नांवीं ढकलावी लागली इतकी त्याची आज हीन स्थिती आहे. पण विठू महाराची किंवा महाराष्ट्राच्या अखिल महारांची एका काळीं सर्वांवर मात होती. त्यांनीं महाराष्ट्राचा महत्त्वपूर्ण इतिहास घडविला, हें आधुनिक इतिहासकारांनीं सिद्ध केलें आहे.

"महार जातीनें राज्यें स्थापन केलीं, इतरांची धुळीला मिळविलीं आणि राज्यवैभवाचे सुखसोहाळे भोगले; आणि त्यानंतर गुलामगिरीच्या खातेऱ्यांत आयुष्य घालविलें. या जातीचा इतिहास जितका चित्तवेधक, रोमहर्षक आणि स्फूर्तिदायक आहे तितकाच तो हृदयद्रावक आहे."

महारांच्या इतिहासाचें सांगोपांग दिग्दर्शन करणारे एक मिशनरी प्राध्यापक ॲलेक्झांडर रॉबर्टसन आपल्या Mahar Folk (**महार जात**) या प्रबंधाच्या प्रास्ताविकेंत म्हणतात:—

"दैवाची वक्रदृष्टी असलेल्या या महार समाजाचा प्राचीन काळीं अभ्यास करतांना त्यांच्या त्या दारुण स्थितीकडे पाहून आपेती. व व्याकूळ होतें, अंतःकरण दयेनें पाझरलें जातें. ज्या समाजरूढीनें, धर्मानें त्याना अशा निघृणतेनें गांजलें त्याबद्दल मनांत आत्यंतिक जळफळाट होतो. ही त्वेषभावना शास्त्रीय निष्कर्षांत अवगुंठित असली तरी माझ्या मनांत उद्भवलेल्या नैतिक जळफळाटाची कारणमीमांसा शास्त्रानें केली पाहिजे. महारांवर सामाजिक अन्याय झाला आहे ही वस्तुस्थिती आहे आणि म्हणूनच त्यांची न्याय्य बाजू मला मांडावीशी वाटते."

आधुनिक कवीनें काढलेलें महाराचें शब्दचित्र कितीहि वास्तववादी असलें तरी त्याच्यावर अन्याय करणारें आहे. त्याच्यावर लादलेल्या दुःस्थितीचें तें विदारक चित्र आहे, हें शहाण्या माणसांनीं विसरतां नये.

## महार संस्कृतीचा इतिहास कुठें लोपला ?

महाराची प्राचीन परंपरा याहून मोठी उदात्त आणि वैभवशाली आहे. श्री. वामनराव भट यांनीं आपल्या The Harijans of Maharashtra (**महाराष्ट्रांतील हरिजन**) या पुस्तकांत **महार** हें एक राष्ट्र होतें. असें निर्वेधपणें प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात, 'महाराष्ट्राच्या पठारावर व्यापून राहिलेली **महार** ही मोठी जमात होती, ती एक राष्ट्रच होती, हें दर्शविणारे खूप पुरावे आहेत. ही जमात बहुधा परकीय आक्रमणाखालीं चिरडली जाऊन आपलें सर्वस्व गमावून बसली. शतकानुशतकांची गुलामगिरी त्यांच्या पदरीं आली.

बेडन पॉवेल म्हणतात, "पश्चिम भारतांत महारांचें अधिराज्य होतें. आणि त्यामुळेंच '**महाराष्ट्र**' हें नांव या भूप्रदेशाला प्राप्त झालें आहे. हें खरें असो वा नसो पण एकाकाळीं या प्रदेशांत महार राजे राज्य करीत होतें. त्यांचे कायदे सत्ता चालवीत होते आणि त्यांच्या अशा स्वतंत्र चालिरीती व स्वतंत्र धर्म-संस्कृति होती, हें दाखवून द्यायला

दामाजीर आहेत. [महार दिसावयाला धिप्पाड आणि कडवे आहेत. हे स्पष्ट तर हुशार आणि धाडसी आहेत. त्यांच्या स्त्रियाही देखण्या उत्तम कर्तबगार आहेत." ( शिवराम जानबा कांबळे चरित्र )

**महार** ही शासनकर्ती जमात होती तशी त्यांची स्वतंत्र अशी संस्कृति होती. महार—संस्कृतीचा इतिहास त्यांच्या पराक्रमाच्या इतिहासाबरोबरच गडप झाला. महारांचा वैभवकाल **महाराष्ट्री** या प्राकृत भाषेच्या काळांतील असल्यामुळेच त्या भाषेबरोबरच तो लुप्त झाला. महाराष्ट्री भाषेचें वाङ्मय आज उपलब्ध असते तर महारांचा तेजस्वी राजकीय इतिहास समजला असता असें अनेक प्रमुख इतिहासकारांचें मत आहे.

प्राचीन महाराष्ट्राचा संशोधनात्मक इतिहास लिहिणारे महाराष्ट्राचे माननीय इतिहास संशोधक व कोशकार डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनीं आपल्या संशोधनांत महारांच्या पूर्वपीठिकेसंबंधीं एक निश्चित स्वरूपाचा सिद्धांत आपल्या 'प्राचीन महाराष्ट्र—शातवाहनपर्व' या इतिहासग्रंथांत गृहित धरला आहे. या सिद्धांतानें त्यावेळच्या सोवळ्या इतिहासकारांचा भडका झाला असला तरी इतिहास हा सत्यकथनासाठीं असल्यामुळें त्यांनीं आपल्या मताचें निर्भय प्रतिपादन केलें आहे. त्यांचें संशोधन सखोल व विस्तृत आहे. कांहीं ब्राह्मण इतिहासकार इतिहास सांगतांना आपली जात विसरून जाऊं शकले नाहींत व त्यामुळें सत्यकथन दूषित झालें आहे. परंतु डॉ. केतकरांच्या बाबतींत मात्र त्यांचें ब्राह्मणत्व मुळींच आड आलेलें नाहीं. महारांच्या प्राचीनत्वाबद्दल त्यांनीं मांडलेला सिद्धांत त्यामुळेंच अधिक खरा आणि क्रांतिकारक वाटतो.] त्यांचें या सिद्धांतावरील संपूर्ण विवरण येथें दिलें आहे:—

## डॉ. केतकरांनीं मांडलेला महारांच्या प्राचीनतेबद्दलचा अमोल सिद्धांत

महाराष्ट्रांत अत्यंत प्राचीन काळीं कोणत्या जाती होत्या, त्याचें पुढें काय झालें आणि जातींची घटना आणि विघटना कशी होते, हा एक

स्वतंत्र विषय आहे. येथें एवढेंच सांगतों कीं, अत्यंत प्राचीन काळीं **कोळी, भोई, महार** आणि **रट्ठ** यांची वस्ती महाराष्ट्रांत होती. व त्यामुळेंच स्थलनामें व भाषानामें निश्चित् झालीं आहेत.

भाषेचें नांव, देशनाम त्याचप्रमाणें लोकनामही शातवाहन कालीं निश्चित् झालें होतें, असें उपलब्ध पुराव्यांवरून स्पष्ट म्हणतां येतें.

**महारट्ठ** हे **मराठे** या शब्दाचें पूर्वरूप असून तें ब्राम्ही लिखाणाच्या काळापासून एक सारखें उपयोगांत आहे. नानाघाट, भाजें, कार्ले व कान्हेरी येथील शिलालेखांतुन दान करणाऱ्या पुरुषांच्या नांवाच्या पाठीमागें **महारठि** व स्त्रियांच्या नांवाच्या पाठीमागें **महारठिनी** असें लिहिलेलें असतें. नानाघाट क्रमांक १ शिलालेख यांत **वेदिसिरिस.... महारठिनो** हे शब्द आले आहेत. तसेंच बर्जेस व भगवानलाल यांच्या "पश्चिम हिंदुस्थानांतील लेणीं" यांत पान २४ वर '**महारठिस कोसकीपुतस विण्हुदतस**' ( भाजें लेख ) आणि '**महाभोय बालिकाय महादेविय महारठिनिय**' ( बेंडसें लेणें २ ) हे शब्द आहेत. तसेंच '**महारठिस गोतिपुत्रस अग्निमित्रणकस**' ( कार्लें लेणें आवे. ५ पृ. ८६ ) असे शब्द आले आहेत. हें सर्व **महारठ** शब्दाचे उपयोग महाराष्ट्राचे देश व लोक या नात्यानें अस्तित्व निःसंशय सिद्ध करतात.

प्रसिद्ध इतिहास संशोधक राजवाडे आपल्या 'महाराष्ट्राचा वसाहत काल' या लेखांत आणि 'राधामाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेंत महाराष्ट्र नांवाची व्युत्पत्ति व महाराष्ट्रीयांच्या पूर्वजांची परिभ्रमणें देण्याचा आणि वंश निश्चित् करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्या मतें मगध देशाधिपति महाराजांचे जे भक्त ते महाराष्ट्रिक बौद्धक्रांतीला कंटाळून दक्षिणारण्यांत शिरले. त्यांच्या दक्षिण प्रवेशाचा काल राजवाडे यांच्या मतें शकपूर्व सहाशें असा आहे. अशोकाच्या शिलालेखांत उल्लेखिलेले राष्ट्रिक ( रिस्टिक ) आणि महाराष्ट्रिक अगदीं निरनिराळे होत. या महाराष्ट्रि-

कांनीं नर्मदेपासून पैठणचा प्रांत व्यापिला. कालांतरानें महाराण्ट्रिकांच्या खालच्या भागांतील वैराष्ट्रिक आणि राष्ट्रिक यांचाही समावेश महाराष्ट्रिकांत होऊन या तिघांचें देश मिळून **त्रिमहाराष्ट्रिक** बनलें. सोळाशें वर्षेपर्यंत दक्षिणेंत महाराण्ट्रिकांनीं स्व (?) धर्म–संरक्षणाचें काम केलें. इ० इ०

राजवाडे यांनीं '**महा**' शब्दाचें स्पष्टीकरण '**महार**' शब्दाव्यतिरिक्त करण्यासाठींच मगध महाराजांचा आश्रय महाराष्ट्रीयांच्या पूर्वजांस घडविला काय अशी शंका येते. शिवाय शकपूर्व सहाशें वर्षे या कालाच्या पूर्वीं महाराष्ट्रांत मनुष्यवस्ती फारशी नसावी, ही कल्पना त्यांच्या मनांत असल्यामुळें त्यांनां बाहेरचे लोक आणण्याची इच्छा झालीं आणि त्या लोकांना येण्याचें कारण दाखविलें पाहिजे म्हणून मगधाधिपतीच्या भक्तांना बौद्धक्रांतीला कंटाळण्याचें श्रेय राजवाड्यांनीं दिलें आहे. महाराष्ट्रिकांना बौद्धधर्माचा एवढी जुगुप्सा असती तर दक्षिणेंत पुढें मोठमोठे पर्वतीय बौद्ध–विहार कसे उत्पन्न झाले असते ? या विषयीं शंका राजवाड्यांच्या मनास शिवली नाहीं, असें दिसतें. अशोकाच्या लेखांतील राष्ट्रीय हेच जर महाराष्ट्रीयांचें आद्यजनक घेतले तर 'महा' शब्दाचें स्पष्टीकरण होत नाहीं. म्हणून मगध महाराजांकडे जावें लागलें. आणि त्यानंतर उत्तरकालीन वस्तुस्थितीशीं म्हणजे पुराव्याशीं विसंगत अशी अनुमान–परंपरा राजवाडे यांस चिकटवावी लागली.

राजवाडे यांनीं आपल्या विधानाला समाधानकारक आधार दिला नाहीं. माझ्या मतें राष्ट्रिकांचें आगमन त्याहूनही अत्यंत प्राचीनकाळीं झालें असावें. 'महाराष्ट्र' हें नांव राष्ट्रिकामुळें आलें असें गृहित धरलें, तर वररुचीच्या काळाच्यापूर्वीं अनेक शतकें या प्रदेशांत राष्ट्रिकांचें म्हणजे रट्ठांचें आगमन होऊन त्यांचेंच नांव देशाला मिळावें, इतकें तेथें त्यांचें जुनेपण झालें असलें पाहिजे. **महाभोज** आणि **महारठी** अशीं दोन नांवें दिसतात. या गोष्टीस देखील महत्त्व आहे. दोन्हीं नांवें संयुक्त समाजाचीं

द्योतक आहेत. एका ठिकाणीं **महार** आणि **भोज** म्हणजे भोई यांचें एकत्व होऊन संयुक्त समाज स्थापन झाला असावा. महारांचा उल्लेख हालाच्या सप्तशतींत नाहीं. ‘**महार**’ हेच प्राचीन काळीं **हलिक** या नांवानें प्रसिद्ध असावेत. हलिकांप्रमाणेंच भोई आणि भोईणी यांचा उल्लेख सप्तशतींत आहे. आणि महाभोजांचा उल्लेख अनेक अंकित लेखांत आहे. त्यापैकीं एकाचें अवतरण केलेंच आहे. त्या अवतरणांतील ‘भोय’ या शब्दाचा अर्थ ‘भोई’ असा करणें अग्राह्य आहे, असेंही अनेक वाचकांना वाटण्याचा संभव आहे. तथापि येथें केवळ मतनिर्देशापलिकडे जातां येत नाहीं. मतसिद्धीचा उपक्रम पुढें होणारच आहे.

## ‘महारठ’ या शब्दाच्या अर्थाविषयीं मतभेद

डॉ. स्टीव्हन्सन व डॉ. भगवानलाल हे दोन अभ्यासक गृहस्थ ‘महारठि’ याचा अर्थ ‘मोठा योद्धा’ व ‘महारठिनी’ याचा अर्थ वीरपत्नी असा करतात. पण याच्याशीं विरोध दाखवून रा. काणे असें दाखवितात कीं, त्यांनीं लावलेल्या अर्थांना पुष्कळ विरोध आहे. पहिली गोष्ट ही कीं, असल्या लहान अर्पणपत्रिकेंत कोणालाहि ‘महारथी’ म्हणण्याचें प्रयोजन नाहीं. बरें, आतांपर्यंत उपलब्ध असलेले अनेक शिलालेख जर आपण लक्ष्यपूर्वक वाचले तर असें आढळून येईल कीं, दान करणाऱ्या गृहस्थाचें नांव, गांव, त्याचा मानमरातब, धंदा, कूळ व त्याचा इतर लोकांशीं असलेला संबंध याशिवाय कांहींहि नसतें. या दृष्टीनें पाहतां ‘महारठि’ चा अर्थ महारठांत राहणारा वा त्या जातीचा असा करणें अधिक संयुक्तिक व योग्य आहे. ( उदाहरणार्थः महारठ कोसिक ) पुनः ‘महारठि’ हा शब्द ज्या नांवाच्या पाठीमागें लावलेला आहे, ते सर्व-जण या मोठ्या मानास योग्य होते, असें म्हणण्यास आधार नाहीं. उलट त्यांतील पुष्कळ युद्धास अननुरूप पेशाचेच होते, असें दिसतें. असेंहि दिसून येईल कीं, वरील सर्व शिलालेखांतून दान करणाऱ्याच्या नांवाच्या

पाठीमागें बहुतेक त्याचें रहाण्याचें ठिकाण पंचमी विभक्तींत घातलेलें असतें, किंवा त्यांच्या नांवाबरोबर एकादा सन्मानदर्शक शब्द असतो. रा. काणे यांचा आक्षेप **महारठि** शब्द आलेल्या सर्व ठिकाणीं संयुक्तिक वाटत नाहीं, तरीं तो महत्त्वाचा आहे.

'महाराष्ट्र' हा शब्द इसवी सनानंतर ५०० वर्षांनीं उपयोगांत आला, असें गृहित धरून **महारठि** या शब्दाचा निराळाच अर्थ लावला पाहिजे, असा अनेकांचा आग्रह आहे. हे लोक **महाराष्ट्र** हा देशशब्द या नात्यानें ख्रिस्ती शक ५०० पूर्वी नव्हता ही गृहीत गोष्टच आक्षेपणीय आहे, हें विसरतात.

## महाराष्ट्र शब्दाची व्युत्पत्ति. महार जातीचा संबंध महाराष्ट्राशीं लावण्याबद्दल पाश्चात्य ग्रंथकारांचा आग्रह आणि देशी ग्रंथकारांचा विरोध.

हिंदूंतील **महार** या अस्पृश्य जातीवरून **महाराष्ट्र** हें नांव पडलें असावें अशा तऱ्हेचा अर्थ मोल्स्वर्थसाहेबांनीं आपल्या मराठी शब्द-कोशांत सांगितला आहे. याच अर्थाची पुनरावृत्ति जॉन विल्सन यांनींहि केली. (इंडियन ॲन्टिकेटी ग्रंथ ३, पृष्ठ २२१) आपल्या अर्थाच्या पुष्टयर्थ त्यांनीं 'गांव तेथें महारवाडा आहे' या म्हणीचा आधार सांगून गुर्जर–राष्ट्र, सौराष्ट्र वा सौर–राष्ट्र (शूरांचें राष्ट्र) या शब्दाशीं तुलना केली आहे; या विद्वानांची अशी समजूत आहे कीं, आजच्या महाराष्ट्राचे मूळचे रहिवाशी म्हणजेच महार. त्यांना उत्तरेकडील लोकांनीं जिंकिलें व त्यांनीं **महार** या मूळ जातीवरून या प्रदेशाला **महाराष्ट्र** असें नांव दिलें. मोल्स्वर्थ व विल्सन यांचें मत आजच्या महाराष्ट्रीयांस रुचकर वाटत नाहीं, यांत शंका नाहीं. तथापि या कल्पनेस जे आक्षेप भांडारकर काणे वगैरे मंडळींनीं घेतलें आहेत तेहि समाधानकारक नाहींत.

**महाराष्ट्र हा महारांचा देश,** ही कल्पना वरील मराठी म्हणीवरून कशी सुचते असें रा. काणे चौकसतात. त्यांना उत्तर असें कीं, ती म्हण महारांच्या वसतीच्या व्यापकतेची सूचक आहे. जेथें अगोदर वसती असतें तिच्या शेजारींच नवीन वसती आहे. जेथें अगोदर वसती असते, तिच्या शेजारींच नवीन वसती येते आणि नवीन वर्ग जेता असला म्हणजे आपली वस्ती हा मुख्यग्राम समजतो. आणि जुनी वसती त्या गांवच्या 'नेटिव्ह क्वार्टर्स' समजतो, ही गोष्ट आजही दिसत आहे. त्याप्रमाणें महाराष्ट्रांतील वसाहतीची स्थिती झालेली आहे. प्रत्येक ठिकाणीं गांव तिथें महारवाडा आहे व तो महारवाड्याच्या शेजारीं वसलेला आहे व त्यामुळें 'जेथें गांव तिथें महारवाडा' या तऱ्हेची म्हण स्वाभाविक आहे. महारांचा महाराष्ट्राशीं संबंध जोडण्यासाठीं जे प्रयत्न झाले आहेत त्यांतील कित्येक दूरान्वयाचे व कांहीं इतिहासाशीं पारखे असणारांचे झाले आहेत. आणि त्यांच्या प्रयत्नांतील दोषांमुळेंच 'महार' शब्दाचा महाराष्ट्राशीं संबंध असावा ही कल्पना बऱ्याच लोकांना हास्यास्पद झाली आहे.

**महारांचा संबंध महाराष्ट्राशीं असावा** ही कल्पना खोडून काढण्यासाठीं गस्टाव्ह आपर्ट या खुळ्या लेखकाचें मत रा. काणे यांनीं अवतरलें आहे; आपर्टसाहेब महार व मल्ल यांचा संबंध जोडतो व महाराष्ट्राला 'मल्लराष्ट्र' म्हणत, असें सांगतो. पुढें म्हणतो कीं, 'मल्ल व मारा एकच. मारा हें मार किंवा म्हार म्हणून प्रसिद्ध आहेत. म्हार म्हणूनच महार हा शब्द झाला व हे दोन्ही शब्द मराठींत आजसुद्धां प्रचारांत आहेत. म्हणूनच मल्लराष्ट्र व महाराष्ट्र हें दोन्ही शब्द उपयोगांत होते. पहिला शब्द उपयोगांत येईनासा झाला व पुढें महारांचा पाडाव झाल्यानें महाराष्ट्राचा व त्यांचा संबंध विस्मृत होऊन महाराष्ट्राचा **मोठें राज्य** असा अर्थ निघाला. मल्लांचा व महारांचा देश हें नांव नाहींसें झालें.' (भारतवर्षांतील मूळचे रहिवाशी १८९३ पा. २२ टीप) यापेक्षां

उथळ उतारा सांपडणें शक्य नाहीं. या तऱ्हेनें रा. काणे यांनीं ह्या लेखकाच्या मताची थोडक्यांत संभावना केली आहे.

डॉ. आपर्ट ह्या कल्पनेच्या भराऱ्या मारणाऱ्या आणि लक्ष्य देण्यास निरुपयोगी अशा लेखकाचें जादा विधान खोडलें म्हणजे मूळ विधान खोडलें असें होत नाहीं. रा. काणे पृच्छा करतात— महाराष्ट्रांत महारांचे राज्य होतें याविषयीं डॉ. आपर्टनीं एखादा तरी लेख पुढें आणला आहे काय? भाषाशास्त्रांतील कोणत्या नियमानुसार त्यांनीं मल्ल व म्हार यांचा संबंध जोडला? **मल्ल** हें आजच्या महाराष्ट्रांत रहात होतें, हें दाखविण्यास त्यांनीं कोणत्या जुन्या संस्कृत ग्रंथाचा आधार सांगितला आहे. **आपण मूळचे रहिवासी** असें महार म्हणतात. केवळ त्यावर विश्वास ठेवून **महाराष्ट्र** हें रा. काणे यांनीं प्रतिपक्षावर हल्ला केला आहे. मल्लांशीं असंबंध सिद्ध करण्यापुरती रा. काणे यांची टीका ग्राह्य आहे. पण महारांचें नेतृत्व सिद्ध करण्यास त्यांनीं केलेलें आव्हान स्विकारणें अनवश्य आहे.

## महारांचें नांव देशास मिळालें, या विधानास महारांच्या हीन स्थितीचा पुरावा अपकर्षक होत नाहीं.

एखाद्या विशिष्ट लोकांचें अगर जातीचें नांव देशाला पडलें असलें तरी ते लोक त्या देशाचे जेते होते, असें मुळींच होत नाहीं आणि त्यामुळें महारांच्या नेतृत्वास प्रमाण काय असें रा. काणे. पृच्छा करतात. पण हें प्रमाण दाखविण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. उलटपक्षीं जित लोकांचेंच नांव देशास जेत्यांकडून दिलें जातें. हिंदुस्थान हें नांव शेजाऱ्यांनींच हिंदुस्थानला दिलें व तेच इराणी व अफगाण शेजारी पुढें जेते झाले. अमेरिकेमध्यें आज जीं अनेक संस्थानांची नांवें आहेत, ती रेड इंडियन लोकांच्या जातीची नांवें आहेत.उदाहरणार्थ डाकोटा. '**डाकोटा**' या नांवाची एक जात होती किंवा राष्ट्र होतें. त्यावरून **डाकोटा** हें नांव या संस्थानांस

अनुक्रम 29695 ... दि: 31-7-61
क्रमांक 6060 ...... नों: दि:

पडलें. अमेरिकेंतील संस्थाननामांखेरीज अनेक स्थलनामें रेड इंडियन जातीचींच आहेत. उदाहरणार्थ, केयूगा, कननडैग्वा वगैरे ज्या देशांत जे लोक प्रमुख असतील किंवा बऱ्याच जमावानें असतील, त्या लोकांचें नांव देशाला पडतें. जेता परका असला तरी तो पुढें तेथील लोकांचाच अग्रणी होतो. संस्कृत वैय्याकरण लोकनामच राजास आहे, असा नियम सांगत आहेत. आंध्र म्हणजे आंध्र जातीचे लोक किंवा आंध्राचा राजा. एवंच महार लोकांचें राज्य तें **महार राज्य** होय. **महाराज्य,** भोज्य असे शब्द ब्राह्मणांत येऊन गेलेच आहेत. महाराज्य म्हणजे महारांचे राज्य; म्हणजे महाराष्ट्र व भोज्य म्हणजे भोजांचें राज्य, असा अर्थ घ्यावयास मला अजून हरकत दिसत नाहीं. संवयीमुळें भोई, कोळी हीं राष्ट्रस्वरूपी जातीचीं नांवें धंद्याचीं नांवें आहेत, अशी बऱ्याच लोकांची समजूत झाली आहे. कोळी या शब्दाचा अर्थ मासे पकडणारे असा होत नाहीं किंवा भोई याचा अर्थ पालखीवाहक असाही होत नाहीं.

**महाराष्ट्र** हें नांव केव्हां पडलें याचा शोध करतां करतां आपणांस वररुचीच्या काळापूर्वींपर्यंत गेलें पाहिजे. त्या काळांत येथील लोक आपणांस महार म्हणवीत नसतील कशावरून? त्यावेळेस प्रथम महारांची वस्ती असणें व मागाहून भोयांची वसती असणें हा अत्यंत शक्य असा इतिहास वाटतो, महारांखेरीज सर्व महाराष्ट्रभर पसरलेली अशी दुसरी जातच प्राचीनकाळीं नसावी. आज मराठ्यांची जात जरी महाराष्ट्रभर आढळतें, तरी ही जात मूळतः भिन्नवंशीय असून नुकतीच कोठें एकजीव होऊं लागली आहे. 'महारठ्ठ' किंवा 'मराठे' हें नांव पुण्याच्या आसपासच्या लेखांत सांपडतें. परंतु या नांवाची व्याप्ति जुन्या काळांत थोडी होती.

मराठे या नांवाची व्यापकता कशी वाढत गेली व आजसुद्धां कशी वाढत आहे, याचे वर्णन अन्यत्र केलें आहे. थोडक्यांत सांगावयाचें

म्हटलें म्हणजे असें सांगतां येईल कीं, **महारठी** या नांवाचा एक केंद्रिभूत वर्ग अत्यंत प्राचीनकाळीं म्हणजे शातवाहन कालीं होता, यांत शंका नाहीं. तथापि कुणबी जाती आपणांस पेशानें **कुणबी** (कुटुंबी–प्रतिष्ठित गृहस्थ) म्हणवीत. **महाराष्ट्र** हें कधींच राष्ट्रनाम नसल्यामुळें सर्व कुणबी लोकांनां **महारट्ठ** म्हणवून घेण्याचा काळ आला नाहीं. सर्व कुणब्यांनीं मराठा म्हणवून घेण्याची चळवळ अलिकडील आहे. **मराठा** हा आतां जातिविषयकच शब्द बनत असून त्याला राजकीय स्वरूप नाहीं. अशा काळाची कल्पना करा कीं, ज्या काळांत महारांचींच वस्ती होती अशा वेळेस भोंवतालचे लोक त्या प्रदेशास काय म्हणणार? अर्थात् **महारांचेंच राष्ट्र** म्हणणार, हें उघड आहे. **महार** हें त्यावेळेस कुटुंबी ऊर्फ कुणबी हें नांव धारण न करितां हलिक हें नांव धारण करीत असले पाहिजेत. त्यावेळचा सर्व **जानपद वर्ग महारच** असावा. महारांचें सामाजिक स्थित्यंतर शातवाहनोत्तरकाळीं झालें असावें. जे हलिक असतील ते महारच असावेत, ही शक्यता आहे. यासंबंधाचें विवेचन पुढें येणारच आहे. सध्यां एवढें म्हणणें प्राप्त आहे कीं, महारांचें राष्ट्र किंवा महार आणि रट्ठ हें स्पष्टीकरण नाकारण्यास किंवा विक्षिप्त ठरविण्यास कोणताही महत्वाचा पुरावा अजून झालेला नाहीं. महार आणि रट्ठ यांच्या संयोगानें झालेल्या शब्दाचें संस्कृतीकरण झाल्यानंतर शब्दाचें अर्थांतर होऊं लागावें यांत नवल नाहीं. **महारांचें राष्ट्र** स्पष्टीकरण कांहीं भोळ्या मंडळीस रुचकर वाटत नाहीं तरी तेवढ्यावरून महारांचा देश शब्दांशीं संबंध असिद्ध होत नाहीं.

## महार, मिहिर आणि मैत्रक यांचा असंबंध

रा. काणे हें मिहिर व म्हार यांचा एकमेकांशीं संबंध नाहीं, असें दाखविण्यासाठीं जें लिहितात तें स्वीकारण्याजोगें आहे. महारांना चांगली स्थिति होती हें दाखविण्यासाठीं **महारांचें राष्ट्र** या स्पष्टीकरणाच्या

अभिमान्यांनीं विनाकारण ज्या बाष्कळ कल्पना उत्पन्न केल्या त्यापैकींच मिहीर आणि म्हार यांच्या संबंधाचा आहे. आणि तें मत खोडण्यास रा. काणे यांनीं शब्द खर्चे केलें आहेत.

महारांचे मिहिर व मैत्रिक लोकांशी सबंध जोडणारे विद्वान् आहेत, ते मिहिरांच्या गुजराथेंतील विजयी कारकीर्दींचा पुरावा देऊन महाराष्ट्र विजय सिद्ध करूं पाहातात. मिहिर हे लोक हूण जातींचेच घटक होत. त्यांनीं तोरमाण, व मिहिरकूल यांच्या आधिपत्यकाळीं काठेवाडांत वल्लभीच्या गुप्तानां पराजित केलें, व नंतर सेनापती भट्टारकानें त्याच्याशीं सामना दिला. एवढाच ऐतिहासिक पुरावा पुढें आणतात. रा. काणे मिहिराचे गुजराथेंतील विजय मान्य करून त्यावरून महाराष्ट्र विजय सिद्ध होत नाहीं, असें दाखवितात. आणि **महाराष्ट्र** हें नांव त्याच्या नांवांवरून पडणें शक्य नाहीं, असें आपलें मत देतात. मिहिर व मैत्रक लोकांनीं सिंध, राजपुताना व काठेवाड वगैरे प्रांत काबीज केलें याला पुरावा असला तरीं ते लोक महाराष्ट्रांतही आले होतें. असें कोठेंच उल्लेख नाहींत. शिवाय महार हे इतके उत्तरकालीन असून जर मैत्रकासारखें जेतें होते तर ते पुढें समाजांत हीन स्थितीला कसें पोंचलें, हे आपणास दिसत नाहीं. अशा तऱ्हेची टीका करून रा. पांडुरंगपंत सांगतात कीं, **महाराष्ट्र** हें नांव अगोदरच्याच काळांत पडलें त्या अर्थी महारांचा व मैत्रकांचा संबंध जोडून त्यांच्यावरून **महाराष्ट्र** हें नांव पडलें, हें मत अग्राह्य ठरविण्यास जास्ती कारणें दाखविण्याची गरजच नाहीं. तोरमाण व मिहिरकूल यांच्या हाताखालीं हूण लोकांनीं गुप्तराजाशीं इ. सनानंतर पांचव्या शतकांच्या उत्तरार्धांत लढाई दिली. पण त्याच सुमारास रचल्या गेलेल्या महावंशांत **महारट्ठ** नांवाच्या प्रदेशाचें नांव आलें आहे, हें आपणांस माहित आहे. तोरमाणाच्या अधिपत्याखालीं जेव्हा हूण लोक स्कंधगुप्ताशीं लढत होते, त्याचवेळीं **महाराष्ट्र** हें नांव प्रचारांत होतेंच.

मिहिरांवरून महाराष्ट्र हें नांव निघालें नाहीं, हें रा. काणे यांचें मत ग्राह्य धरूनही महारांचा महाराष्ट्राशीं शब्दोत्पादक संबंध नाकारतां येत

नाहीं. रा. काणे आणखी एक आक्षेप आणतात कीं, दाक्षिणेंतील स्वाऱ्यांच्यावेळीं औदिच्यानीं **महारावरून महाराष्ट्र** हें नांव दिलें, हें खरें धरल्यास विंध्याद्रिच्या दक्षिणेकडील प्रदेशावरील उल्लेखांत ( प्राचीन ) महाराष्ट्राचें नांव आल्यावांचून राहिलें नसतें. पण त्या ऐवजीं **अश्मक** व **दक्षिणापथ** हीं नांवें येतात याला उत्तर एवढेंच कीं, **महाराष्ट्र** हा शब्द **दक्षिणापथ** या शब्दांइतकाच जुना आहे. आणि वररुचीच्या काळीं त्या शब्दाचें अस्तित्व होतें व ज्या कारणामुळें **महाराष्ट्र** हें नांव निर्माण झालें तें कारण म्हणजे **महारांकडून देशाची वसाहत** ! हें नांव वररुचीच्या पूर्वीं अनेक शतकें उत्पन्न झालें होतें. अर्थात् इतक्या जुन्या काळचें वाङ्मयच अस्तित्वांत नाहीं. त्यामुळें **महाराष्ट्र** शब्दाच्या जन्मास कारण असलेल्या महारांच्या आगमनासाठीं प्रमाण मागणाऱ्यास **कथं स लक्ष्य प्रभवो भविष्यति,** असेंच उत्तर द्यावें लागेल.

## महारांचें प्राचीनत्व आणि त्यांचें नाग, हलिक आणि राष्ट्रिक यांशीं नातें

**महाराष्ट्र** हा शब्द वररुचीच्या म्हणजे कात्यायनाच्या कालाच्या पूर्वींचा असल्यामुळें त्याचा उगम पहावयाचा झाल्यास बुद्धाच्या पूर्वीच्या काळाची सामाजिक व राजकीय स्थिती लक्षांत आणून त्यावर विचार केला पाहिजे. पण त्या काळाचीं इतिहास साधनें या प्रश्नावर प्रकाश पाडीत नाहींत. त्या काळांच्या इतिहासाचीं साधनें कोणतीं ? असें विचारलें असतां तीनचार साधनांचा उल्लेख करतां येईल. प्राचीनतम वाङ्मयांतील प्राचीनतम आठवणी या काळाच्या इतिहासास साधनीभूत होतील. महाराष्ट्रांतील अत्यंत प्राचीन वाङ्मय म्हणजे **हालांची सप्तशती** होय. तीवरून असें दिसतें कीं, त्यावेळेस प्रमुख जानपद हलिक होतें. गोदातट व विंध्यपर्वत हे दोन्ही प्रदेश वाङ्मयांत येत होते. प्राकृत हें नांव भाषेला अधिक प्रिय होतें. या वाङ्मयांत रट्ठांचा

ठेंच उल्लेख होत नाहीं व महारांचाही येत नाहीं. म्हणजे महाराष्ट्र ब्दाचा इतिहास शोधणारास तो सातशें गाथांचा संग्रह फारशी मदत रीत नाहीं. वाङ्मयाशिवाय दुसरें साधन म्हटलें म्हणजे त्याकाळची भाषा. तिचा सामाजिक इतिहासास पुष्कळच उपयोग होतो. पण जुनी मानववंशशास्त्रीय माहिती देण्याइतका महाराष्ट्रीय व इतर प्राकृतांचा अभ्यास वाढलेला नाहीं प्राचीन काळचें साहित्य जेव्हां उपलब्ध नसतें तेव्हां त्या काळचें सातत्य आज ज्या परंपरांत आहे त्या परंपराच्या आजच्या प्रतिनिधींची तपासणी अवश्य होतें. त्या काळच्या लोकांचा आजपर्यंत आलेला वंश याच दृष्टीनें अभ्यासार्ह आहे. त्या दृष्टीनें जातींचें इतिहास महत्वाचे आहेत. पण तें अजून जाति–महत्व–स्थापकांच्या तडाख्यांतून सुटून ऐतिहासिकांच्या कक्षेंत आले नाहींत. अनेक जातींचें सातत्य पांच सहाशें वर्षेपर्यंत अभ्यासतां येतें. पण अधिक पाठीमागें जातां येत नाहीं. भाषेच्या दृष्टीनें पाहतां सर्वांचीच भाषा स्थित्यंतर पावली आहे. **महार** हें इतर जातींप्रमाणें मराठी भाषा बोलणारे आहेत. आणि या दृष्टीनें महारांचें भाषा सातत्य बिघडलें आहे, असें म्हणतां येत नाहीं. **ज्या काळांत महाराष्ट्री ही भाषा होती ती भाषा बोलणारे लोक हे महारच असतील या कल्पनेस बाधक असा पुरावा नाहीं.** महाराष्ट्रीची मराठी कशी व केव्हां झाली हें अजून आपणांस सांगतां येत नाहीं. मराठी चालुक्योत्तर काळीं झाली, असें अर्वाचीन मत आहे. तथापि महाराष्ट्री व मराठी यांच्या दरम्यान अपभ्रंश होता. त्याचा काल कोणता त्याच्या मर्यादा निश्चित नाहींत. पैशाचीचें देखील थोडेसें आक्रमण झालें असेल आणि त्यामुळें प्रतिष्ठित महाराष्ट्री भाषा नष्ट होऊन शातवाहनाच्या काळांत अपभ्रंश भाषेचा उदय झाला असेल अशी शंका उपस्थित होते, व ती होण्याचें कारण शातवाहनांच्या काळीं अपभ्रंशांचें अस्तित्व होतें, अशी साक्ष बहत्कथा देत आहे, हें होय.

औदीच्या घराण्याशीं बरींच राजघराणीं संबंध लावतात. तथापि रजपूतांचीं आडनांवें मराठ्यांप्रमाणें महारांतही आढळतात. महारांमध्यें कुलपरंपरा कमी अबाधित राहिली असल्यामुळें आज विधान करणें कठीण जाईल. तथापि एवढें म्हणतां येईल कीं, **महाराष्ट्रांतील अत्यंत प्राचीन लोकांचे वंशज महार असावेत आणि त्यांचा नागांशीं संबंध त्या प्राचीनतेचा द्योतक असावा.** जेत्यांनीं नागास जिंकलें असे उल्लेख वारंवार दिसतात. पुराणांतील नागांचीं कुलनामें महारांत आडनांवें या रूपानें शिल्लक आहेत असें राजवाडे यांनीं **कोकण** व **नागलोक** या इतिहास संग्रहांतील लेखांत दाखविलें आहेच. एवंच अत्यंत प्राचीन वसाहत नागांची म्हणजे महारांची असल्यास **महाराष्ट्र** म्हणजे **महारांचें राष्ट्र** या प्रकाराच्या व्युत्पत्तीस अधिक बळ येईल. यांत शंका नाहीं. महारांची वस्ती अत्यंत जुनी आहे. व नाग म्हणून उल्लेखिलेल्या लोकांचे तेच प्रतिनिधि आहेत.

वर उल्लेखिलेल्या अनेक मतांची येथें केवळ मांडणी केली आहे. त्यांची ग्राह्याग्राह्यता पुढें तपासली आहेच.

**महारांचें महाराष्ट्र** असें म्हणणें नाकारणारे लेखक आहेत, त्यांत कै. रामकृष्ण भांडारकरांचा समावेश होतो. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, **राष्ट्रिक उर्फ रट्ठ** नांवानें प्रसिद्ध असे लोक होते. राष्ट्रिक तेच **रट्ट** व त्यांचेच संस्कृत रूप राष्ट्रिक! **रट्ट** या जातीचें लोकच पुरातन काळापासून दक्षिणापथाच्या ( दक्षिणेच्या ) राजकारणांत सर्वापेक्षां जास्ती दृग्गोचर होतात व चालुक्यांच्या उदयापूर्वीं त्यांच्या जातींतील एक पोटजात राष्ट्रकूट या नांवांखालीं या देशावर राज्य करीत होती. तदनंतर रट्ट या नांवाचें राजे बेळगांव जिल्ह्यांतील सुगंधवर्ती किंवा सौंदत्ती येथें राज्य करीत होते. भोजराजे विदर्भ व दक्षिणेच्या इतर भागावर अधिकार चालवीत हें आपणांस माहित आहे........ज्याप्रमाणें भोज आपणांला महाभोज असें म्हणत, त्याप्रमाणेंच हें राष्ट्रिक, रट्टि, रठी अथवा रट्ट लोक

स्वतःला महारट्टि अथवा महारठ्ठ असें म्हणत. म्हणून त्यांच्या देशाला **महारठ्ठ** असें नांव पडलें. यालाच संस्कृतमध्यें **महाराष्ट्र** म्हणतात." डॉ. भांडारकरांचें म्हणणें स्विकारलें नाहीं. तथापि येथें दिलें आहे. जेव्हां अत्यंत प्राचीन नांवाची उत्पत्ति संशयातींत नसतें तेव्हां भिन्न स्पष्टीकरणें वाचकांपुढें ठेवणें अवश्य आहे. म्हणूनच भांडारकरांचें स्पष्टीकरण दिलें आहे. यावर रा. काणे यांचें भाष्य पुढीलप्रमाणें आहे.

## महाराष्ट्र, दंडकारण्य आणि महाकांतर यांचा संबंध

महाराष्ट्र शब्दाची उपपत्ति लावतांना त्याचा राष्ट्रकूटांशीं संबंध जोडण्याची जी पद्धति आहे त्यांतील मुख्य दोष रा. काणे यांच्या मतें कालदूरता मूलक असंबंधाचा होय. राष्ट्रकूट राजे इ. सनानंतर ८०० वर्षांनीं उदयास आलें व **महाराष्ट्र** हा शब्द त्यांच्या आगमनापूर्वी निदान तीनशें वर्षें लोकांत प्रचलित होता. इ० सनापूर्वी २०० शें वर्षांपासून ते इ० सनानंतर ७५० वर्षेंपर्यंत अनुक्रमानें नागभृत्य (किंवा शातवाहन) वाकाटक आणि चालुक्यांनीं दाक्षिणेंत राज्य केलें मग उत्तरकालीनांचें नांव देशाला कसें चिकटेल? अशी रा. काणे यांच्या मनांतील शंका आहे. महाराष्ट्राशीं राष्ट्रिकांचा संबंध नाकारणारी जी यांची टीका आहे ती आमच्या मतें चुकीची आहे. कारण राष्ट्रिकांचा संबंध देशनामाशीं जोडण्यास राष्ट्रकूटाचें राजत्व आवश्यक नाहीं. केवळ जमावानें अस्तित्व पुरें आहे. शिवाय वररूची पूर्वकाळीं राष्ट्रिक ही राष्ट्रस्वरूप जाति असावी.

डॉ. भांडारकरांचें म्हणणें चूक ठरवून रा. काणे आपलें मत मांडतांना तें दर्शनीय अर्थाचेंच समर्थन करीत आहेत असें दिसतें. तें म्हणतात महाराष्ट्र म्हणजे **मोठें अथवा विस्तृत राष्ट्र**! हाच दर्शनी अर्थ इतिहास सूचक आहे, असें समजून पुढें सांगतात कीं, इतिहासाला ज्ञात असलेल्या अगदीं प्राचीन काळापासून दक्षिणेंत महाकांतार,

दंडकारण्य, अथवा महाटवी हें एक सुप्रसिद्ध अरण्य होतें. हळूहळू या अरण्याचा नाश होऊन तेथें वसाहत झाली. शहरें, गांवें वाढलीं व त्याला **महाराष्ट्र** हें नांव मिळालें. तसेंच त्याला महाकांतारही म्हणत. **रामाच्या वनवासाची माहिती** (Geography of Rama's Exile) या लेखांत पार्गिटर म्हणतो कीं बुंदेलखंडापासून कृष्णेपर्यंत पसरलेल्या सर्व प्रदेशाला दण्डक हें नांव लावीत." रा. काणे यावरून अनुमान काढतात कीं, (वनपर्व अ. ८५–४०–४२) मध्याहिंदुस्थान व तापी पयोष्णी, या नद्यांच्यामध्यें कुठेंतरीं दण्डकारण्य असावें. रामायणांत दण्डकारण्यांतील वैजयन्त या शहराचा पुढील प्रमाणें उल्लेख आला आहे

**दिशामास्थाय कैकेयी दक्षिणादण्डकान् प्रति ।**
**वैजयन्तमिति ख्यातं पुरं यत्र तिमिध्वजंः**

अयोध्याकांड ९–१२

मार्कंडेय पुराणांत दण्डकाबरोबर विदर्भाचाही उल्लेख आहे. (विदर्भः दण्डकैः सह) हुएनसँग आपल्या प्रवासवृत्तांत कांत्रकिंनापुलो (कोकणपूर) मोहोलाच (महाराष्ट्र) या मधील एका अरण्याबद्दल लिहितो.

## महाराष्ट्र हें नांव शातवाहनाच्या राज्यविस्तारामुळें मिळालें या विधानाची अग्राह्यता

दण्डकारण्याचें राष्ट्र पुनः कधीं व कोणामुळें झालें याविषयीं रा. काणे आपली समजूत अशी दाखवितात कीं, बहुत करून आंध्रभृत्य किंवा सातवाहनाच्या वेळींच महाराष्ट्र असें म्हटलें असावें. (म्हणजे इ. सना पूर्वी २०० वर्षें, सातवाहन राज्य बलाढ्य होतें व त्यांचें राज्य कारोमंडल किनाऱ्यापासून पश्चिमेस घाटापर्यंत पसरलें होतें. आणि ज्या अर्थी सातवाहनाचें राज्य म्हणजे राष्ट्र मोठें होतें, त्याअर्थी त्यास **महा** हा शब्द लावणें स्वाभाविकपणेंच आहे. आणि ज्याअर्थी त्याची राजधानी मराठी प्रदेशांत म्हणजे पैठण येथें होती, त्याअर्थी तोच प्रदेश **मोठें राज्य**

म्हणजे **मोठें राष्ट्र** बनला. **महा** हा शब्द **महाकान्तार** शद्बाकडून वारसा हक्कानें आला आणि जेथें अटवी होती तेथें एका राजकुलाच्या अवधींत मोठें राष्ट्र स्थापन होऊन तें मोठें असल्यामुळें **महा** शब्द तसाच चालू राहिला, असा रा. काणे यांचा आशय दिसतो.

पुष्कळ देशांचें अंत्यपद नेहमीं **राष्ट्र** हा शब्द आहे. पण आद्यपद मात्र नीटसें कळत नाहीं, असे जे दुसरे शब्द आहेत त्यांच्याशीं संगती लावण्याचाही प्रयत्न रा. काणे यांनीं केला आहे. ते सांगतात, फार प्राचीन काळापासून काठेवाडाला **सौराष्ट्र** हें नांव आहे. बौद्धायनस्मृति पाणिनीयशिक्षा व रामायण यांतून सौराष्ट्रासंबंधीं थोडाबहुत उल्लेख आहे. दशरथ राजाचे सहकारी सौराष्ट्र होते, असें सांगितलें आहे.—**प्राचीनान्सिन्धुसौवीरान् सौराष्ट्रेयांश्च पार्थिवान्** (१, १३, २७) **द्राविडाः सिन्धु सौवीराः सौराष्ट्रा दक्षिणापथाः** (२, १०, ३०) वगैरे— रा. काणे कबूल करतात कीं, या देशाला सुराष्ट्र असें नामाविधान कां पडलें हें कांहीं आपणांस माहित नाहीं. हा प्रदेश सुपीक व संपन्न म्हणून हें नांव पडलें असावें अशा तऱ्हेची एक कल्पना मांडून सुराष्ट्र शब्द सिद्ध करूं पहातात. आणि महाराष्ट्राच्या शब्दसिद्धीसाठीं दुसरीही एक कल्पना रा. काणे मांडतात. ती अशी कीं, राष्ट्र या शब्दानें ज्या देशाचें अगर राष्ट्राचें वर्णन केलें आहे, अशीं अनेक राष्ट्रें महाराष्ट्रांत समाविष्ट होत होतीं. प्राचीन ग्रंथांतून कर्मराष्ट्र, गोपराष्ट्र, देवराष्ट्र आणि पूर्वराष्ट्र देश दिले आहेत. पण ते कुठें होते तें समजत नाहीं. (चालुक्याच्या दानपत्रांत **कर्मराष्ट्र** असें आलें आहे. गोपराष्ट्र म्हणजे नाशिक असावें. **देवराष्ट्र** हा दाक्षिणापथाचा भाग असें लिहिलें. Cor. Ins. I, Vol III P 7) अरंग येथील श्रीमहाजयराजाच्या ताम्रलेखांत पूर्वराष्ट्र हें नांव आढळतें. वरील उल्लेखावरून असें दिसतें कीं, दाक्षिणापथांत हे सर्व प्रदेश मोडत असत. वरील विवेचनावरून **महाराष्ट्र** शब्दाचा मूळ अर्थ **विस्तृत प्रदेश** असाच रा. काणे यांच्यामतें आहे.

**महार** शब्दाचा महाराष्ट्राशीं संबंध नाकारणाऱ्या दोन मतांचे विवरण झालें. **महाराष्ट्र** शब्दाची आमच्या मताची उपपत्ति देण्यापूर्वी **सौराष्ट्र** या शब्दाच्या स्पष्टीकरणासंबंधानें एक मत व्यक्त करण्याचें धैर्य करतों. सौराष्ट्र याची व्युत्पत्ति **सौर+राष्ट्र** अशी देतां येईल. सौरधर्माचा एकाकाळीं काठेवाडांत फारच प्रचार होता. सुराष्ट्र हा शब्द **सौराष्ट्र** याच्या अगोदरचा समजण्यास बिलकूल आधार नाहीं. **सोरठ** हा प्राकृत शब्द असून त्याचें प्रथम संस्कृतीकरण सौराष्ट्र होऊन नंतर **सुराष्ट्र** या शब्दाची निर्मिती झाली असावी.

**महाराष्ट्र** या शब्दासंबंधानें वर दिलेली कै. भांडारकर व रा. काणे यांची स्पष्टीकरणें आम्ही मान्य करीत नाहीं. प्रस्तुत वादांत दोन प्रश्न उपस्थित होतात.

एक प्रश्न **महा** या पूर्वभागासंबंधानें आहे, तर दुसरा **राष्ट्र** किंवा **रट्ठ** यांच्या अर्थासंबंधानें आहे.

**महारांचे राष्ट्र** या स्पष्टीकरणाला कांहीं मंडळी असा आक्षेप घेतील कीं. राष्ट्र हें सामान्यनाम नाहीं, लोकांचे विशेषनाम आहे. त्याअर्थी **महा** हा शब्द विशेषणार्थी घेतला पाहिजे.

उलटपक्षीं, **राष्ट्र** या शब्दांत विशिष्ट जातींना नाकारणारी रा. काणे यांच्यासारखे लेखक **राष्ट्र**शब्द विशिष्टलोकविषयक न धरतां केवळ सामान्यनाम धरूनही **महा** या शब्दाचा जातिविषयक अर्थ घेण्याचें नाकारतात व तो शब्द विशेषणच धरतात. **महा** शब्दाचें विशेषणत्व नाकारणारा वर्ग थोडा आहे. **राष्ट्र** शब्दात्मक संयुक्त शब्द अनेक होते आणि त्या सर्वांचा महाराष्ट्रांत अंतर्भाव होतो, असें एक वर्ग मानतो आहे. तर राष्ट्र हा शब्द सामान्यनाम नसून विशिष्टनाम आहे. **राष्ट्रिक** नांवाचे लोक होते त्यांसच **रट्ठ** किंवा रिस्टिक म्हणत असत त्यापासून देशनाम निघाले असावें असें मानणारा दुसरा पक्ष आहे. या दुसऱ्या

९०५३८ २१

पक्षास देखील **महा** हा शब्द जातीवाचक किंवा लोकवाचक शब्दापासून निघाला असेल, ही कल्पना मान्य नाहीं. तथापि **महार** शब्दाशीं **महाराष्ट्र** न जोडण्याला इच्छेपेक्षां निराळें कारण त्यांना दाखवितां आलें नाहीं. राष्ट्र हा शब्द विशेषनाम धरल्यास **महा** हा शब्द विशेषणच केला पाहिजे असें नाहीं. उलट दोन्ही विशेषनामें संयुक्त होऊन देशनाम तयार होऊं शकतें. अनेक राष्ट्रनामें दोन राष्ट्रांच्या किंवा जातींच्या नांवांच्या संयोगापासून निघालीं आहेत. उदाहरणार्थ, **कुरु—पांचाळ**, **कुथ—कैशिक**, **सिंधुसौवीर** इत्यादि नांवें सांगतां येतील. **महाराष्ट्राच्या महार आणि रट्ठ या दोन राष्ट्रजातींच्या नामांचा संयोग होऊन महारट्ठ असें रूप तयार झालें आणि त्याचें पुढें महाराष्ट्रिक—कालांतरानें महाराष्ट्र असें संस्कृतीकरण झालें, असें माझें याविषयीं अंतिम विधान आहे.** **रट्ठ** या नांवाचे लोक चोहोंकडे हिंडत होते व त्यांच्या भ्रमणांचीं स्मारकें चोहोंकडे आहेत. **सौराष्ट्र** उर्फ **सोरट्ठ**, आरट्ठ वगैरे उदाहरणें रट्ठांच्या भ्रमणांची स्मारकें आहेत. **रट्ठ** या शब्दाचा अर्थ **राष्ट्र** किंवा **लोक** असाच असावा. पुष्कळ राष्ट्रांचीं विशेषनामें तपासून पाहिलीं तर असें दिसून येईल कीं, त्या नामांचा मूळचा अर्थ त्या जातीच्या भाषेंत लोक असाच आहे.

डॉ. केतकरांच्या या एवढ्या विस्तृत चर्चेतून महारांच्या प्राचीन इतिहासावर झगझगीत प्रकाश पडतो. त्यांच्या या सर्वंकष विवेचनांतून **महार** ही महाराष्ट्राची अतिप्राचीन जमात आहे हें सिद्ध झालें असलें तरी महारांच्या जेत्यांनीं त्यांच्यावर अतिनिष्ठुर गुलामगिरी कां लादली आणि ब्राह्मणकालांतील हिंदुसमाजरचनेंत त्यांना चातुर्वर्ण्यांत घुसडून देऊन कायमचें अस्पृश्य कां बनविलें, याचें उत्तर मिळत नाहीं.

## महार शब्दांत ‘ डोंगा ’ अर्थ नाहीं

महारांचें प्राचीनत्व सिद्ध करणारा प्राचीन इतिहास उपलब्ध नसतांही डॉ. केतकरांसारख्या खंद्या इतिहास संशोधकानें इतिहासाला लागणाऱ्या

साधनांच्या आधारें महारांचें प्राचीनत्व बऱ्याच अंशानें सिद्ध केलें आहे. त्याच्या संशोधनांला पुरातन ताम्रपट किंवा ग्रंथाधार फारसे मिळालें नाहींत हें खरें. पण प्रज्ञावंत इतिहाससंशोधक त्यावरच अडून बसूं शकत नाहीं. त्याच्या अंगीं अनुभवसिद्ध बुद्धीची परिपक्वता असते. त्या बुद्धीची तेजस्वी ज्योत तो भूतकालाच्या गडद अंधारांत फेंकतो आणि आपल्या परिमाणांच्या आधारें सिद्धांत मांडतो. त्या सिद्धांताला पुनः पुनः कसाला लावतो. आणि म्हणूनच सर्वसाधारण बुद्धीला न पटणारा पण सत्य असलेला इतिहास तो जगापुढें मांडतो. महारांचा प्राचीन इतिहास याच पद्धतीनें त्यांनीं सांगितला आहे. तो खराखुरा आहे याबद्दल शंकाच नाहीं.

कै. राजारामशास्त्री भागवत, राजवाडे आदि इतिहासकारांनीं त्यांच्या सिद्धांताला पोषक अशींच मतें व्यक्त केलीं आहेत. डॉ. भांडारकरां-सारखा वर्णश्रेष्ठत्वाचा दंभत्याग करूं न शकणारा इतिहासकार या सिद्धांताला विरोध करूं शकतो. **गांव तेथें महारवाडा** या नांवावरून महाराष्ट्राचा प्राचीन वारस महार आहे हें सिद्ध होऊं शकत नाहीं; असें त्यांना वाटतें. १९१२ सालीं डिप्रेस्ड क्लास मिशनच्या पुणें येथील अधिवेशनांत सर रामकृष्ण भांडारकर यांनीं **महार** शब्दाची एक निराळीच व्युत्पत्ति सांगितली. मार्कंडेय पुराणांतील एक श्लोक दाखवून त्यांतील **मृतहर** शब्दावरून **महार** शब्दाचा जन्म झाला असें निवेदन केलें. एखाद्या जमातीच्या सांस्कृतिक इतिहासाचा इतका उथळ अर्थ करण्याचें सर भांडारकरांनीं केवळ हेतुपुरस्सर धाडस केलें असेंच म्हणावें लागेल. उच्चारसादृश्यापेक्षां यांत महार आणि मृतहर याचा सुतराम संबंध दिसत नाहीं. प्रा. रॉबर्टसन यांच्या शब्दांतच या विधानाचें खंडन करावयाचें झालें तर 'याचें उत्तर अगदीं सोपें आहे.' महारां-सारख्या अनेकाविध पोट जातींच्या आणि व्यवसायांच्या लोकांना सर्वत्र सर्वसकट **मृतहर** म्हणून संबोधणारा शब्द कसा लागू पडतो ? शिवाय संस्कृत भाषेचा ज्यांना गंध नव्हता अशा लोकांना संस्कृत नामाभिधान

असणें कसें शक्य आहे? अखिल भारताची संस्कृत ही भाषा होती. असें असतांना केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित असलेल्या जमातीला **मृतहर** ह्या संस्कृत शब्दानें कां संबोधिलें जावें? फक्त महाराष्ट्रांतच कांहीं जनावरें मरत नव्हती. मृत जनावरें वाहून नेण्याचें काम सर्वत्रच हिंदुस्थानभर चाले. मग भारतभर मृतहरांना महार कां म्हटलें गेलें नाहीं? प्राचीन काळापासून महाराचें अस्तित्व मराठी भाषेच्या परिसरांतच आहे. डॉ. भांडारकरांचा हा शोध (?) मान्य केला तर संस्कृत भाषा मराठी भाषेमधून आली असें म्हणावें लागेल. असें म्हणणें जितकें विक्षिप्त तितकेंच **मृतहर म्हणजे महार म्हणणें विक्षिप्त** आहे. शिवाय **महार** हा शब्द पंजाब व राजपुताना इकडे प्रचारांत आहे. पंजाब आणि राजपुताना येथील गुजरांना बहुमानार्थी **महार**, **मिहीर** किंवा **मिर** असें संबोधिलें जातें. महाराना अस्पृश्यत्वानें प्राप्त झालेल्या कनिष्ट स्थितीमुळें महारांचा महाराष्ट्राशीं संबंध लावावयाचा नाहीं हाच एक हेतु या विरोधभूमिकेंत आहे. प्रांजल इतिहासकारांनीं तरी याप्रकारच्या कलुषित वृत्तींचा आपल्या इतिहाससंशोधनांत उपयोग करूं नये.

## महारांनां दुर्दशा कां प्राप्त झाली?

महारांना ही कनिष्ठ स्थिती कशी प्राप्त झाली हें समजून घेणें त्यासाठीं इष्ट आहे.

महाराष्ट्राचा प्राचीन वसाहतकाल निश्चित करणाऱ्या संशोधकांनीं महारांनां आद्यवसाहत करणाऱ्या टोळ्यामध्यें समाविष्ठ केलें आहे. हा वसाहतकाल ख्रिस्तपूर्व १५०० पासून ख्रिस्तपूर्व ५५३ पर्यंतचा आहे, असें डॉ. केतकरानीं गृहीत धरलें आहे. इराणचा पौराणिक काल आणि भारताचा उत्तर पौराणिक काल या कालाला समांतर असा काल होय. या कालांत महाराष्ट्रांत खालील इतिहास घटनांचा क्रम लागतो.

१ कालाच्या आरंभीं कुरुयुद्ध, त्या कालांतील राज्यें.

(१) क्राथ राज्य—राजा देवावृध, (२) वैदर्भराज्य—राजा भीष्मक (३) अश्मक राज्य (४) कुंतल राजा चंद्रहास (५) गोकर्ण आणि अपरांत येथील वसाहती (६) विदर्भावर मागध जरासंधाचें सार्वभौमत्व.

२ **महार आणि रट्ट यांच्या वसाहती.**

३ शकांचा प्रवेश.

४ नरसिंह या प्रतिष्ठान भूपतीची बलाढ्यता आणि त्याजकडून मागधराज विक्रमादित्य याचा पराभव.

५ निदान एकदां शकनिर्दालन.

६ कलिंगराजाची कांहीं काल महाराष्ट्रावर सत्ता.

७ कुंडिनपुर राज्य; तेथील राजघराण्यांतील विवाहांचें सामाजिक व धर्मशास्त्रीय महत्व.

८ नागपूरचा नरसिंह.

९ उदयनकालीं महाराष्ट्राची बलाढ्यता.

१० महाराष्ट्री भाषेचें निदान खि. पू. १००० पासून स्वतंत्र अस्तित्व.

११ वररुचीचें प्राकृत व्याकरण.

वरील कालक्रमावरून भारताच्या उत्तरपुराणकालांत महाराष्ट्रांत महार व रट्ट यांच्या वसाहती प्रस्थापित झाल्या. महारांनीं प्रथम वसाहत केलेल्या महाराष्ट्रांत रट्टादि इतर टोळ्यांनीं प्रवेश करून त्यांना जित केलें व जेत्यांची वसाहत निर्माण केली. वसाहत करणारे नेहमींच मूळ वसाहत करणाऱ्यांच्या आजुबाजूस वसाहत करतात हा सिद्धांत **गांव तेथें महारवाडा** याला पोषक आहे. त्यावरूनच महारवाड्याशेजारीं किंवा सभोंवतालीं इतरांनीं वसाहत करून त्यांच्यावर जेतेपणाचा अधिकार

चालविला असला पाहिजे असें निक्षून सांगतां येतें. मात्र **महार** मूळ रहिवाशी आहेत ही गोष्ट त्यांना नाकारतां आली नाहीं. याचा पुरावा म्हणजेच महार ' मूळपुरुष ' आहे किंवा **' गांवचा थोरला '** आहे असें म्हटलें जातें. त्याच्या प्रथम वसाहत करण्याच्या हक्कामुळेंच जमीनजुमल्यासंबंधींचें त्याचें ज्ञान हें निर्णायक स्वरूपाचें मानलें गेलें व तत्कालीन व त्यापुढेंहि त्याला गांवगाड्यांत अधिक महत्वाचें स्थान मिळालें.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, **महाराष्ट्रांतील महार** जात ही अस्पृश्यांतील प्रमुख जात आहे. महाराष्ट्रांत अस्पृश्य जातींपैकीं फक्त महार जातीची संख्या इतर कोणत्याहि जातीपेक्षां मोठी आहे. महार लोक व हिंदु यांचे संबंध कसे होते हें दर्शविणाऱ्या घटना नमूद करण्यासारख्या आहेत.

१. दरेक गांवांत महारांची वस्ती आहे.

२. महाराष्ट्रांतील दरेक गांवांभोंवतीं कुसव (तट) असून महार लोक कुसवाबाहेर रहातात.

३. महार लोक आळीपाळीनें आणि गांवकऱ्यांच्या वतीनें गांवाची राखण करतात.

४. हिंदु गांवकऱ्यांकडून महार लोक बावन्न हक्क वसूल करतात. या बावन्न हक्कांपैकीं खालील हक्क महत्वाचे आहेत.

(१) गांवकऱ्यांकडून अन्न उकळणें.

(२) सुगीच्यावेळीं प्रत्येक गांवकऱ्यांकडून धान्य गोळा करणें.

(३) गांवकऱ्यांची मेलेला जनावरें ताब्यांत घेणें.

महार लोकांच्या वरील हक्कावरून जो पुरावा सांपडतो तो अर्थातच महाराष्ट्रापुरता मर्यादित आहे. अशीच स्थिती हिंदुस्थानांतील इतर भागांत सांपडते काय याचे अजून संशोधन व्हावयाचें आहे. तथापि

अस्पृश्य जमातींतील महार जातीची परिस्थिती ही देशभर वैशिष्ट्यपूर्ण समजली तर कांहीं गोष्टी मान्य कराव्या लागतील त्या अशाः—

" हिंदुस्थानामध्यें असा एक काल होता कीं, परटोळींतील पराजीत लोक हे स्थानिक टोळीवाल्याकडे आले. त्यांनीं स्थानिक टोळीवाल्यांशीं सौदा केला. आणि त्या सौद्यांतील अटीनुसार गांवांबाहेर जित लोकांना राहूं देण्यांत आलें. त्यांच्यावर ( पराजितांवर ) कामें लादण्यांत आलीं आणि कामाच्या मोबदल्यांत त्यांना कांहीं हक्क देण्यांत आले "

" महार लोक गांवकऱ्यांकडून ५२ हक्क परंपरेनें वसूल करीत आहेत. बेदरच्या मुसलमान राजांचें शिक्कामोर्तब महारांच्या ५२ हक्कांवर आहे. याचा अर्थ हे हक्क **फार पुरातन काळापासून चालत आले असले पाहिजेत. आणि बेदरच्या मुसलमान राजानीं त्यांच्या अमदानींत केवळ राजमान्य केलें असावेत,** हें यावरून स्पष्ट होतें."

" हा पुरावा तोकडा असला तरीं अस्पृश्य लोक हें अगदीं सुरवातीपासूनच गांवांबाहेर राहात होतें, ह्या सिद्धांताला त्यांचेकडून बरीच पुष्टी मिळते. त्यांना हांकलून देण्यांत आलें नव्हतें, अगर ते अस्पृश्य मानल्यामुळें ते गांवाबाहेर राहात नव्हते. सुरवातीपासूनच अस्पृश्य लोक गांवाहेर राहात होतें, कारण ते **जित** होतें. शिवाय ते स्थानिक टोळींवाल्यांहून भिन्न टोळींपैकीं होते."

डॉ. बाबासाहेबांचें हें अनुमान डॉ. केतकर यांच्या सिद्धांताहून भिन्न असलें तरी **महार जमात प्राचीन आहे,** हें दोन्ही मतांचें सूत्र आहे. गेल्या दीड हजार वर्षांच्या संस्कृती–संघर्षांत आणि नव्या टोळ्यांच्या वमाहत–प्रस्तरणांत महारांचा मूळ इतिहास आणि संस्कृती नष्ट झाली असली तरीं त्यांचें इतरांहूनचें भिन्नत्व किंवा स्वतंत्र स्वरूप कांहीं अवशेषांवरून सिद्ध होण्यासारखें आहे. महार हे मूळ नागवंशीय होते हें दाखविणारी त्यांच्या नांवांपुढील '**नाक**' ही उपाधि होय. **नाग** याचें

हें अपभ्रष्ट रूपच होय. हा **नाक** प्रत्यय महाराष्ट्रांतील इतर कुठल्याही प्राचीन जमातींच्या व्यक्तिनामापुढें लाविला जात नाहीं. फक्त तो महारांच्या नांवांपुढेंच लावला जातो. याचा एक स्पष्ट अर्थ असा आहे कीं, **महार** हा इतरांहून कांहीं भिन्न आहे, हें ओळखतां यावें म्हणूनच जेत्यानीं आपल्या हुकमतीचें कायम स्वरूपी चिन्ह त्याच्या नांवाला उपाधीरूपानें चिकटविलें. पेशवांईत अस्पृश्यतेचा कडेलोट दर्शविणारें त्यांच्या गळ्यांतील मडकें आणि पुच्छस्थानीं खटारा हें जें महारानां हिणवण्यासाठीं किंवा त्यांचें भिन्नत्व राखण्यासाठीं अमानुष असें ' चिन्ह ' पाहिलें तद्वतच **नाक** हा प्रत्यय त्याच्या तत्कालीन कमी लेखलेल्या नागवंशांचें चिन्हही महारांनीं आपल्या नांवापुढें वाहिलें. महारांना मिळालेली प्राचीनकालीन आणि पेशवेकालीन वागणूक समानहेतू दर्शविणारी आहे. व म्हणूनच तें **नागवंशीय** आहेत हें निश्चित् होय. पराजितांना कमीपणा आणणें हें जेत्यांचें नेहमींचेंच कार्य होय. अर्थांत आपल्याहून वेगळे मानल्याखेरीज हा कमीपणा कसा यावा ? **नाक** या त्याच्या मूळ वंशनामानें त्यांना वगळून टाकून त्यांचें अस्तित्व वेगळे गखलें व त्या वगळलेल्या—पराभवानें जखमी झालेल्या या पराक्रमी जमातीवर पुढें ब्राह्मणीकालांत अस्पृश्यत्वाचा शिक्का मारला. पराभूततेच्या जखमेवर सामाजिक हीनत्वाचें मीठ चोळलें गेलें.

ब्राह्मणकालीन हिंदुधर्माच्या चातुर्वर्णामध्यें नवीन एका पंचमवर्णाची भर घालून महारादि जमातींना त्यांत सामावून घेतलें तें केवळ त्यांना या चातुर्वर्ण्य चक्रांत गुरफटवून अधिकाधिक हीन बनविण्याच्या सूड बुद्धीनेंच होय. प्रतिपक्षाकडून जेवढा अधिक प्रतिकार होतो, तेवढीच जेत्याची सूड भावना प्रखर होते, हा सर्वसामान्य नियम आहे. या सूड भावनेनेंच महार पंचमवर्णांत समाविष्ठ झाला. पण त्याचें पुरातन ज्ञान उत्तर कालीन वसाहतकारांनां राज्य कारभाराच्या दृष्टीनें उपयुक्त

होतें. आफ्रिकेचा अंतर्गत भाग शोधण्यासाठीं तेथील मूळ निग्रोचा जसा गोऱ्या संशोधकांनीं उपयोग केला तद्वतच महारांना गांवगाड्यामध्यें स्थान देऊन त्यांच्यावर गुलामगिरीचेंच जोखड ठेवलें. कोंकणातील महार हा प्राचीन संस्कृतीशीं आणि रितीरिवाजाशीं निकटवर्ती आहे. त्याचें सातत्य बऱ्याच प्रमाणांत टिकून आहे. इतर ठिकाणच्या महारांच्या मानानें त्यांच्यातील प्राचीन अवशेष उत्कटतेनें दिसतात. याचें मुख्य कारण म्हणजे नव्या आक्रमणापासून आणि मध्ययुगीन अनेक संस्कृतींच्या भेसळीपासून तो बराच दूर होता. मात्र मध्यमहाराष्ट्रांतील महार मूळ संस्कृतीपासून अधिक पारखा झाला. वस्तुतः महार संस्कृतीचें खरें केंद्र नागपूर होय. नागपूर हें नामाभिधान नागवंशीय प्राचीन सत्तेचें दर्शक आहे. आणि या सभोंवतालची महारांची वस्तीही इतर ठिकाणांच्या मानानें अधिक आहे.

**महार** लोक प्राचीन नागलोकच होय हा राजवाड्यांचा मुद्दा गृहित धरला तर त्यांची संस्कृति उच्च कोटीची होती, हें डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनींही प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात, ऋग्वेदांमध्यें जो नागांचा उल्लेख आढळतो. त्यावरून नागलोक कोणी वन्य किंवा असंस्कृत लोक नव्हतें, हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे. नाग लोक आणि हिंदुस्थानांतील राजघराणीं यांचे संबंध विवाहादि बंधनांनीं घनिष्ट होते, असा इतिहासाचा पुरावा आहे........नाग लोकांची संस्कृती उच्च पातळीची होती, एवढेंच नव्हे तर हिंदुस्थांतील बऱ्याच मुलुखांवर त्यांनीं राज्य केलें होतें. महाराष्ट्र हें नाग लोकांचें स्थान आहे हें कुणी सांगावयास नको.

## ‘जोहार’ हें महारांचेंच अग्निदिव्य!

पुरातन महार हें मोठें अभिमानी होतें. याबद्दल निराळा पुरावा शोधावयास नको. त्यांचा स्वाभिमान इतका तळपता आहे कीं, दीडहजार

वर्षाच्या दास्यचक्रांत चिरडला जाऊनही महार आपला स्वाभिमान विसरूं शकला नाहीं. आजच्या हिंदुसमाजाचा तो घटक मानला जात असूनही इतर हिंदूहून तो भिन्न दिसूं शकतो. डॉ. बाबासाहेबांच्या अस्पृश्योद्धाराच्या चळवळींत अहमहमिकेनें भाग घेऊन आपली ही अभिमानी वृत्ति त्यानें प्रज्वलित केली आहे. त्यांच्या ह्या वृत्तीचें प्राचीन परंपरेंतून अवशेष राहिलेलें द्योतक म्हणजे **जोहार** ! हा एक प्रभावशाली शब्द आज महारांतच आहे व तो त्यांच्या पुरातन महार संस्कृतींशी निगडीत आहे. रजपुत स्त्रीयांनीं शत्रूच्या हातीं सांपडण्यापूर्वी केलेला '**जोहार**' किंवा अग्निदिव्य हे त्याचे मध्ययुगीन पडसाद आहेत. पण त्याचे पहिले ध्वनि उमटले ते महार संस्कृतीच्या काळांत होय ! जेव्हां आक्रमक टोळ्यांनीं महारांच्या राष्ट्रांवर किंवा वसाहतींवर पहिलें आक्रमण केलें तेव्हां या पराक्रमी महारांनीं त्याला निकरानें तोंड दिलें असलें पाहिजे. महार बाहुबलशालि आहे किंवा योद्धा आहे हें आजही पाहायला मिळतें. त्याचें हें क्षात्रतेज त्यावेळींही त्यांच्या बाहूंत होतें हें इतिहासाच्या कागदी पुराव्यांनीं सिद्ध करण्याची जरूरी नाहीं. या पराक्रमी महारांनीं आक्रमकांशीं रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढा दिला असला पाहिजे. नाहींतर त्यांनीं आपलें सर्वस्व कसें बरें गमावलें असेल ? **राष्ट्र** म्हणून वावरणारी ही जमात यःकश्चित महारवाड्यापुरती कशी बरें मर्यादित होईल ? मराठ्यांचा इतिहास आम्हांला सांगतो कीं, पेशव्यांनीं पानिपतावर लाखों मराठ्यांचे बळी दिले. मराठेशाही भारतभर टिकविण्यासाठीं पानिपतावर ज्याप्रमाणें मराठ्यांच्या एका पिढीनें आपले देह धारातीर्थी ठेवले तद्वतच महारांनीं महाराष्ट्रांत अनेक ' पानिपत ' रणांगणें लढवलीं होतीं हें खास अनुमान निघतें. मराठ्यांची एक पिढी पानिपतावर कामास आली पण महारांच्या राष्ट्रांत संपूर्ण महार–राष्ट्र नष्ट झालें, व अशा वेळीं पुरुषांचा होणारा निःपात पाहून त्यांच्या स्त्रीयांनीं शत्रूंच्या हातीं लागण्यापूर्वी जपानी ' हाराकिरी ' प्रमाणें **जोहार** करून अग्निदिव्य केलें.

ही घटना घडली नसेल तर महार–राष्ट्र नष्ट होण्यास दुसरें कारण काय असेल बरें ? महारांचें हें अग्निदिव्य उरल्या सुरल्या महारांच्या काळजांत कायमचें स्मृतिरूप झालें. त्यांनीं एकमेकांनां **जोहार** या शब्दानें अभिवादन करण्याचा प्रघात सुरू केला. सुरू केला म्हणण्याऐवजीं तसें म्हणणें अगदीं उत्स्फुर्त होतें. आणि आजही **जोहार** हा प्रघात **त्यांच्यात** चालू आहे. **जोहार** मागील ही घटना इतक्या उत्कट स्वरुपाची नसती तर कालाच्या प्रस्तरांतून हा शब्द टिकून राहिला नसता. तो जर महार–संस्कृतींतून चालत आलेला नसता तर त्यांचा इतर जमातीतही सर्रास उपयोग केला गेला असल्याचा पुरावा उपलब्ध झाला असता.

**जोहार** शब्दाचें महात्म्य याहूनहि भिन्न आहे. **महार** संस्कृतीनंतर ज्या टोळ्यांनीं महाराष्ट्रांत वसाहती केल्या त्यांच्यांत परस्पर अभिवादनाचा प्रघात नसावा. किंबहुना त्यांच्या संस्कृतींत त्यांच्या भावनांना भिडणारा असा प्रसंग किंवा तद्वाचक शब्द नव्हता कीं तो अभिवादन शिरस्ता होऊं शकला असता. अशा प्रकारच्या अभिवादनाच्या शब्दाचें रहस्य शिवाजीच्या कारकीर्दींत रामदासाना जाणवलें. अभिवादन प्रघात फक्त महारांत होता. त्यांच्या सांस्कृतिक ऐक्याची जोपासना करणारा तो प्राचीन दुवा होता, हें रामदासांना पटलें. मोंगलांसारख्या म्लेंच्छांत हा प्रघात असून शिवशाही प्रस्थापित करणाऱ्या मराठ्यांत नसावा ही मोठीच उणीव त्यांच्या लक्षांत आली असावी. आणि म्हणूनच आपलें प्रियतम देवनाम **राम** याचा अभिवादनासाठीं त्यांनीं उपयोग केला, व **रामराम** हें अभिवादन महाराष्ट्रांत रूढ झालें. त्याच्या या अभिवादन शद्वांतील जोरामुळेंच त्यांचें हें **मराठा तितुकाचि मेळवावा** तत्वज्ञान शिवाजीनें उचलून धरलें. पण रामदासाच्या या नवसुधारणेस महारांनीं जुमानलें नाहीं त्यांनीं आपला जोहाराचा प्रघात चालूच ठेवला. ‘ **मी महारीचा महार जोहार मायबाप जोहार** ! या आपल्या जीर्ण प्रथेला तो स्वाभिमानानें

चिकटून राहिला. गुलामाचा स्वाभिमान जगाला कसा दिसावा! महारांचा हा स्वाभिमान इतिहासकारांना कधींच दिसला नाहीं. **जोहार** शब्दांत केवढा आवेश आणि जोष होता हें यावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. महार ऐक्याची ही घोषणा आजपर्यंत कायम राहिली. महारांनीं '**रामराम**' म्हणूं नये '**जोहार'च** म्हणून अभिवादन करावें असा खोटा भास स्पृश्यांनीं केल्याचें सांगण्यांत येतें. पण तें खोटें आहे. महारानींच 'जोहार' सोडला नाहीं. उलट त्यांनीं **रामराम** प्रघात आपल्यांत शिरूं दिला नाहीं हा महार संस्कृतीचा त्यांच्यावरील विजय होता, पण तो त्यांनीं स्पष्ट कबूल केला नाहीं. सनातन्यांनीं जर महारांवर तसा निर्बंध टाकला असें मानलें तर **मराठा तितुकाचि मेळवावा** हें रामदासांचें प्रचार–तत्वज्ञान महारांपुरतें तरीं निष्फळ ठरलें, असें कबूल करावें लागेल.

## मराठी भाषा बोलणारी महार ही एक प्राचीन जमात

मराठी भाषेचें मूळ व शुद्ध स्वरूप अंशतः ज्या जमातींत राहिलें आहे त्यामध्यें महारांचा समावेश अपरोक्षपणें मराठी संशोधन मंडळानें केला आहे; त्यांच्या बोलीचा नमुना हा प्राचीन मराठी बोलीचा अवशेषात्मक नमुना म्हणून श्री. कृ. अ मोडक यांनीं संग्रह केलेल्या **दापोली व खेड तालुक्यांतील महाराची बोली** या मराठी संशोधन पत्रिकेंतील लेखांत दिला आहे. त्यांतील एक नमुना पहा.

मायबापाची ल्येक लाडकी, ल्येक लाडकी ॥ धृ ॥
म्येरू दण्डाचा बनवूनशान् चौरांग् ।
घेत्ला बसायाला खरोखर, घ्येतला बसायाला खरोखर–१
धर्तरीचा करून वाझ्रिका, घेतली आंग घांसायाला ।
सात् समिंदरांचा पानी आटलां, येक्या आंगोलीला–२
आकास्याची बनवून सारी, घ्येत्ली नेसायाला ।
तरी ती पुरना प्येंचाला–३

घर्‌तरीची बन्‌वून् चोली ध्येतली आगांत् घालायाला ।
तरी ती पुर्‌ना गांठीला—४
चंदार् सुर्याचा पाडुनशान् काजाळ् भरलं डोल्यांत ।
तरी तां पुरना येक्या पाप्‌नींत—५
झाडा—झुडपाचे बन्‌वून् गोडें गुंपिले येनीला ।
पाताळ्—भवनांतील् स्येस नाग गुंपिला खोप्याला—६
इन्दार्—च्यापाची बन्‌वूनशानी नत् ।
घातली नाकांत् खरोखर, घातली नाकात् खरोखर—७

भाषेच्या दृष्टीनें त्यांचें प्राचीनत्व शोधणाऱ्या भाषा—शास्त्र विषयक संशोधकांस रत्नागिरी जिल्ह्यांतील महारांच्या बोलींत बरेच आधार आढळण्यासारखे आहे. शिवाय कोकणांत महारांच्या ज्या पूर्वापार जमिनी आहेत. या जमिनीच **महारकाठीं** या नांवानें प्रसिद्ध आहेत. मुसलमानांच्या आमदानींत मिळालेला बावन्न हक्कापैकीं बलुतें म्हणून चालत आलेली जमीन आणि **महारकाठीं** म्हणून वहिवाटींत असलेल्या जमिनी यांत जमीनअस्मानाचा फरक आहे. मुसलमानांच्या अमदानींत जुन्या ग्रामरचनेंनुसार केवळ गांवांची सेवा करण्यासाठींच मिळणारीं बलुतीं हीं त्यांच्या गुलामगिरीचे वेतन होती. पण **महारकाठीं** हीं त्यांनीं स्वामित्व गाजविलेल्या मालकी हक्कानें चाललेल्या परंपरागत जमिनी होत. अशा जमिनींतून महारांचें एक आद्य देवस्थान स्थापीत झालेलें आहे. हा त्याचा सबळ पुरावा आहे. या देवस्थानाचें नांवसुद्धां **महारदेव** असें आहे. वस्तुतः ज्या महार शब्दाचा इतिहासकार काथ्याकूट करतात आणि मृतहर, मल्ल, महा, अरि इत्यादि विक्षिप्त शब्दाशीं बादरायण संबंध लावून त्याच्या उत्पत्तीची व्युपत्ति करतात तो महार शब्द **स्वयंभू** आहे, हें सिद्ध करणारा हा पुरावा होय ! महार हें एका प्रभावशाली वंशाचें नांव आहे आणि तो वंश महाराष्ट्रभूमींत एकाकाळीं सत्तेनें आणि संस्कृतीनेंहि इतका प्रभावी झाला होता कीं, तो **महारदेव** या नांवास पात्र

अनुक्रमांक 29694 ..... दि: ३-३ ...
... 6.20 ..... नों दि:

झाला. कुठल्याहि जमातीच्या नांवाचें एखादें देवस्थान आहे का ? **महार** मात्र देवस्थान रूप होणारी एक शासन शक्ती होऊन गेली व आज ती एका हीन जातीच्या रूपानें आपल्यांत नामशेष राहिली एवढा त्या शक्तीचा केविलवाणा ऱ्हास झाला.

महारांच्या संस्कृतींत दुसरी अधिक प्रकर्षानें दिसणारी गोष्ट म्हणजे त्यांच्या आर्य लोकांहून भिन्न अशा देवता. उत्तरकालीन वसाहती आर्यांच्या होत्या असें इतिहासकार सांगतात. या आर्यसंस्कृतींतील इंद्रादि देवता महारांच्या देवतांहून भिन्न आहेत. त्यांच्या मनावर भूतांखेतांच्या कल्पनेची मोठी पकड आहे. कोणी यांना द्राविडी संस्कृतींतील देवदेवता मानतात. महार मरी आई, खंडोबा, जोतोबा, वेताळ, पांढरी, भादवी अशा देवतांची भक्तिभावानें पूजाअर्चा करतात. ब्राम्हणी धर्माचा जबरदस्त विळखा असतांना मूळ देवाधर्माच्या कल्पना आजपावेतों टिकवून ठेवणारी महार–संस्कृती खरोखरच प्राचीन काळीं प्रभावी संस्कृती असली पाहिजे याबद्दल शंका उरत नाहीं.

## महार अस्पृश्य कसे व केव्हां बनले ?

महारांवर आक्रमण करणाऱ्या दुसऱ्या टोळ्यांनीं त्यांना गुलाम बनविलें. पण त्यांच्यावर अस्पृश्यत्व केव्हां लादलें ? हिंदुधर्मातील अस्पृश्यतेचा उगम शोधून काढणें म्हणजे ऋषीचें कूळ शोधण्यासारखें आहे, असा कांहीं हिंदुधर्ममार्तंडांनीं सर्वांचा समज करून दिलेला आहे. ऋषीचें कूळ शोधून काढलें तर ऋषीच्या विद्वत्तेला कलंक लागण्याची भीती असते, तशी भीती यांच्या मनांत नसेल कशावरून ? अस्पृश्यतेचें मूळ शोधून काढलें तर ती कुणीतरी त्यांच्यावर लादली आहे असें सिद्ध होईल आणि चातुर्वर्ण्य आणि जाती या ‘ परमेश्वरी ’ आहेत हा त्यांचा खोटा प्रचार उघडकीस येईल, हीच त्यांची खरी भीती आहे. कांहीं विद्वान संशोधकांनींही या भीतीमुळेंच याबाबतींत खरें संशोधन केलें नाहीं. हिंदुधर्मांत

अस्पृश्यता आणणारे कुणी होते, असें जर कुणी प्रतिपादन केलें तर 'हिंदुधर्मास हा कलंक' लावणाऱ्या नराधमांना आणि त्यांच्या पुरस्कर्त्यांना माना वर करून धर्मपंडितांचा आवेश आणतां आला नसता. आणि अस्पृश्य म्हणून चिरडले गेलेले बंड करून हिंदुधर्मांतून निघाले असते किंवा हिंदुधर्माला गाडून जेते झाले असते. त्यांनीं दुसरा धर्म प्रस्थापित केला असता. पण इतिहास संशोधकांच्या सावधगिरीमुळेंच हिंदुधर्म अजून बदनाम व्हावयाचा राहिला. तरीही कोंबडा झांकल्यानें थोडेंच उजाडायचें थांबणार? डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं लिहिलेल्या आपल्या 'अस्पृश्य मूळचे कोण? व ते अस्पृश्य कसे बनले' या ग्रंथांत अस्पृश्यतेची जन्मतारीख निश्चित केली आहे. ते म्हणतात " हिंदुस्थानांत आलेला दुसरा चिनी प्रवासी युआन चँग हा होय. तो इ. स. ६२९ मध्यें आला. सोळा वर्षे हिंदुस्थानांत राहून त्यानें या देशांतील लोकांच्या चालिरीती आणि रूढी यांची व्यवस्थितपणे नोंद करून ठेविलीं आहे. हिंदुस्थानांतील शहरांबद्दल व सर्वसाधारण इमारतीबद्दल तो म्हणतोः—

" शहरांभोंवतालच्या भींती उंच व रुंद आहेत तर रहदारीचे रस्ते अरुंद व निमुळते आहेत. मोठ्या हमरस्त्यावर दुकानें असून रस्त्यांच्या दोन्ही बाजूस उपहारगृहें आहेत. खाटीक, कोळी, झाडुवाले यांच्या वस्त्या ओळखतां याव्यात म्हणून त्या त्या वस्तीवर भिन्न भिन्न चिन्हें उभीं केलेलीं आहेत. त्यांना सक्तीनें शहराबाहेर ठेवलें आहे. त्यांना गांवांत जातांना डाव्या बाजूनें अंग चोरून व नरमाईनें जावें लागतें."

" या उताऱ्यावरून निश्चित् असा कोणताच सिद्धांत बांधतां येणार नाहीं. पण युआन् चंग यानें केलेलें वर्णन चांडाळ व्यतिरिक्त जातीचें आहे, ही गोष्ट महत्वाची आहे. त्यावरून त्याकाळीं अस्पृश्यता होती हें अगदीं स्पष्ट होत आहे."

" यावरून इ. स. ६०० मध्यें अस्पृश्यता जन्मास आली होती हा सिद्धांत निघतो. उलट इ. स. २०० पर्यंत अस्पृश्यतेचें अस्तित्व देखील नव्हतें असें दिसून येतें."

" हाच अस्पृश्यतेच्या जन्माचा सर्वसाधारण काळ आहे. अस्पृश्यतेची अदमासें जन्मतारीख आपल्याला निश्चित् करतां येणें शक्य आहे काय ? मला वाटतें आपण ती ठरवूं शकूं. अस्पृश्यतेचें मूळ गोमांस भक्षणांत आहे. गोमांस भक्षणबंदीपासूनच सुरवात धरली पाहिजे. म्हणजे ज्यावेळीं गोवध व गोमांस भक्षण यावर बंदी घालण्यांत आली त्याचवेळीं अस्पृश्यतेचा जन्म झाला, हें आपोआपच सिद्ध होत होतें. गोवध करणें हा गुन्हा आहे व गोमांस खाणें हें पाप आहे हें जेव्हां ठरविलें गेलें ती अस्पृश्यतेची जन्मतिथी होय ! गोवध हा गुन्हा कधीं पासून ठरविण्यात आला ? मनुनें गोमांस भक्षणावर बंदी घातली नव्हती कीं, गोवधास गुन्हा मानलें नव्हतें. मग गोवध करणें गुन्हा कधींपासून समजण्यांत आला ? डॉ. बी. आर्. भांडारकर म्हणतात कीं, गुप्त राजांनीं गोवधास देहान्त शासनाच्या गुन्ह्याचें रूप दिलें. तो काळ त्यांच्या म्हणण्याप्रमाणें इ. स. ४०० चा होता. तेव्हां इ. स. ४०० च्या आसपास अस्पृश्यतेचा जन्म झाला असला पाहिजे असें आत्मविश्वासानें आपण म्हणूं शकतों. हा काळ बौद्धधर्म व हिंदुधर्म यांच्या द्वंद्वाचा आहे. अर्थातच या द्वंद्वांतूनच अस्पृश्यतेचा जन्म झाला."

## हाच वर्ग वैदिक ब्राह्मणी धर्माचा द्वेष्टा होता.

वैदिक ब्राम्हणी हिंदुधर्माला कंटाळून बुद्धानें नवीन धर्माचा प्रचार व प्रसार केला हें सर्वश्रुतच आहे. विशेषतः हिंदुधर्मांतील यज्ञयागाच्या खुळ्या कल्पनेखालीं होणाऱ्या हत्येमुळें बुद्धाला आपला नवा धर्म प्रस्थापित करावा लागला हें एक प्रमुख कारण मानलें जातें. तरीही बुद्धाच्या या नव्या धर्माला आणि तत्वज्ञानाला पटकन् आत्मसात करून

घेणारा महाराष्ट्रांतही त्याकाळीं एक वर्ग होता. आर्य संस्कृतीचा त्यांच्या आचारविचारावर केवढा पगडा होता हा या ठिकाणीं चर्चेचा विषय नसला तरीं आर्यांच्या वैदिक धर्माचा द्वेष करणारा किंवा त्यांच्या धर्मा-मुळें गांजला जाणारा हा वर्ग होता. तो निरनिराळ्या जमातीचा बनला होता. इतिहासकारांच्यामतें हा काळ इ. सनापूर्वी ५०० पूर्वींचा होता. महाराष्ट्रांतील या पुरातन जमाती भ्रमण करणाऱ्या होत्या हें डॉ. केतकरांनीं सांगितलेंच आहे. डॉ. बाबासाहेबांनीं या भ्रमण जमातीचें विवरण आपल्या ग्रंथांत खालील प्रमाणें केलें आहे.

" पुरातन समाज हा फिरता समाज होता याबद्दल कोणालाही शंका नाहीं. परंतु पुरातन समाज हा त्यांच्या स्थलांतरांच्या प्रवृत्तीमुळें फिरत होता किंवा एखाद्या मानसिक स्वभावधर्मामुळें तो फिरत होता असेंही नाहीं. त्याचें कारण वेगळेंच आहे. पुरातन काळीं पशुधनाचाच प्रकार मान्य होता. पुरातन समाजाचें धनच (जनावरें) फिरत असल्यानें समाज फिरता राहिला होता. चाऱ्यासाठीं जनावरें एका रानांतून दुसऱ्या रानांत जात. तेव्हां जनावरांच्या धन–लोभामुळें पुरातन समाजही जनावर जाईल तिकडे जाई. मात्र ज्यावेळीं संपत्तींचा वेगळा प्रकार शोधून काढण्यांत आला त्यावेळीं हा पुरातन समाज स्थायिक बनला. हा संपत्तीचा वेगळा प्रकार म्हणजे जमीन. शेतीची आणि मशागतीची कला त्यांना अवगत झाली. त्यावेळीं हें स्थित्यंतर घडून आलें. जनावरां-ऐवजीं शेतीमध्यें संपत्तीचें रूपांतर झालें. याच बदलामुळें पुरातन समाज हा स्थायिक समाज बनला. "

महाराष्ट्राच्या प्राचीन म्हणून गणल्या गेलेल्या महार, भोई, कोळी या जमातीं अशा तऱ्हेनें स्थायिक झाल्या. परंतु या स्थायिक समाजाला बाहेरून येणाऱ्या दुसऱ्या टोळ्यांच्या आक्रमणाला सतत तोंड द्यावें लागलें. आणि अशा अनेक आक्रमणामुळें व त्यांच्या प्रभावी हल्ल्यामुळें

या मूळ वसाहत केलेल्या लोकांना विस्कटून टाकलें. त्याना पराभूत केलें व **जित** म्हणून वागविलें. डॉ. बाबासाहेब याच लोकांना **जित लोक** ( Broken Men ) म्हणतात. " पूर्वीच्या टोळ्या एकमेकांशीं संग्राम करीत हा संग्राम सतत चाले. परस्परांतील संग्रामाची ही गोष्ट त्यांच्या नित्याच्या जीवनांतील होऊन राहिली होती. टोळ्यांमधील लढ्यांत सर्वत्र पराभूत टोळया नामशेष होत असें नव्हे. कांहीं टोळ्यांना शरणागती पत्करावयास लावून हुसकावून देण्यांत येत असें. त्यामुळें पुष्कळ वेळां पराभूत टोळ्यांतील लोक सैरावैरा झाल्यानें विभागले जात. याचा परिणाम असा झाला कीं, पराभूत टोळ्यांतील लोक लहान लहान गटानें सांपडेल त्या दिशेनें भटकूं लागले. एका अर्थी ही **तरंगणारी** (Floating) लोकसंख्या होती असें म्हणावयास हरकत नाहीं.

## बुद्धधर्मास कवटाळणारा पुरातन महार समाज

महाराष्ट्रांत अशा तऱ्हेनें तरंगलेला व त्याच स्थितींत अस्तित्वांत असलेला **महार** हा एक समाज आहे. व त्याचें अस्तित्व प्रत्येक गांवांत आहे. या समाजांतील लोकांनीं त्यावेळीं बुद्धाच्या धर्मक्रांतीला वाहून घेतलें. आणि बुद्धधर्माचा हिंदुस्थानभर प्रसार केला. त्यानंतर बुद्धधर्माला कांहीं शासनकर्त्यांचा आश्रय—राजाश्रय मिळाल्यानें हिंदुधर्म नामशेष होऊन बुद्धधर्म सर्वत्र फैलावला. यावरून एक गोष्ट निश्चितपणें सिद्ध झाली, ती ही कीं, महार ही पुरातन जमातही एकाकाळीं बौद्धधर्मीय होती. ती बौद्धधर्मीय होती म्हणूनच तिला अस्पृश्यत्व चिकटलें, हें डॉ. बाबासाहेबांच्याच शब्दांत सांगतां येईल.

" जित ( Broken Men ) बौद्धधर्मीय होते. आणि बौद्ध धर्मावर सनातनी ब्राम्हणी धर्मानें जेव्हां शिरजोरी केली तेव्हां त्यांनीं ब्राम्हणी धर्मांत येण्याचें अगत्य दाखविलें नाहीं. या गोष्टी मान्य केल्या तर ब्राम्हणी धर्म अपवित्र आहे असें अस्पृश्य कां मानतात

आणि ब्राम्हण पुरोहितांकडून आपलीं धार्मिक कार्ये कां करून घेत नाहींत आणि आपल्या वस्त्यांमध्यें प्रवेश देखील ते कां करूं देत नाहींत, याचें हें स्पष्ट उत्तर आहे. **जितांना ' अस्पृश्य लोक '** असें कां संबोधिलें गेलें याचेंही मुख्य कारण हेंच कीं ब्राम्हण लोक बुद्ध धर्माचे शत्रू होते. म्हणूनच अस्पृश्यांनीं ब्राम्हणांचा तिरस्कार केला. आणि **जित लोक** बौद्ध धर्म सोडायला तयार होईनात म्हणून त्यांच्यावर अस्पृश्यता लादण्यांत आली. यावरून असें अनुमान काढतां येतें कीं, बौद्ध धर्मीयांविरुद्ध ब्राम्हणांनीं जो तिरस्कार व द्वेष प्रसृत केला त्यामध्यें अस्पृश्यतेचें मूळ आहे. "

महारसुद्धां याचप्रकारें अस्पृश्य बनले.

## आणखी एक सोज्वळ मत

महारांच्या प्राचीनत्वासंबंधीं ' पूजा ' या नियतकालिकांतील एका लेखांत महाराष्ट्राचे एक आधुनिक लेखक श्री. ग. त्र्य. माडखोलकर म्हणतात कीं, महाराष्ट्र समाजाच्या या चार घटक वर्गांपैकीं अस्पृश्य हे सुमारें तीस टक्के असून त्यांत महार ही जात बहुसंख्य आहे. भिल्ल कातकरी, ठाकूर, गोंड, वार्ली वगैरे जंगली जातीप्रमाणें महार वगैरे अस्पृश्य हेही आदिवासी समजले जातात. या वन्य जाती आणि अस्पृश्य या दोन घटक समाजांतील फरक हा कीं, वन्यांना स्वतःची संस्कृति किंवा नागर जीवन नाहीं, तर अस्पृश्य हे बहिष्कृत असूनही त्यांच्या मानानें सुसंस्कृत आणि नागर गणले जावेत इतका त्यांचा बौद्धिक दर्जा चांगला आहे. त्यामुळेंच **गांवकींत आणि राजकींत अस्पृश्यांना म्हणजेच मुख्यतः महारांना मानाचें आणि मोक्याचें स्थान मिळालेलें दृष्टांस** पडतें.

महाराष्ट्रांतील मराठा—कुणबी बहुजन समाजाप्रमाणें महार हेही नागवंशीं आणि सोमवंशीं मानले जातात व त्याची आणि मराठा कुणबी

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 29895 दि: 30/3/17
880 नों: दि: 2015

जातीचीं कांहीं आडनावेंही सारखींच आहेत. आज त्यांचा इतिहास बव्हंशीं अज्ञात आहे पण त्यांच्यासंबंधीं जें थोडें बहुत संशोधन झालें आहे, त्याच्यावरून असा निष्कर्ष काढण्यांत येतो कीं अस्पृश्यांपैकीं **महार** ही महाराष्ट्रांतील आदिवासी **राष्ट्र — रूपी जमात** ( National Clan ) असून दक्षिणेंत आलेल्या आर्य, शक इत्यादि सुप्रगत समाजांनीं तिला पादाक्रांत करून आपलें दास बनविलें. पण जित आणि दास बनविल्यानंतरहि या जमातीच्या बुद्धिमत्ता, शौर्य आणि इमानदारी या तीन गुणांमुळें तिला गांवगाड्यांत स्थान देणें त्रैवर्णिकांनां आवश्यक वाटलें........!

## मानव–वंशशास्त्राचा आधार

मानववंशशास्त्राच्या आधारें महारांची सांस्कृतिक परंपरा पाहतां महारांचें स्थान हिंदुसमाजांत वरचें आहे, हेंहि आतां सिद्ध झालें आहे. अर्थात् अशा प्रकारचा सिद्धांत फार जपून मांडावा लागतो. व्हिस्काउंट ब्राईस यांच्या मतें "गोंडस मत प्रतिपादन करण्याच्या मोहामुळें ऐतिहासिक संशोधनाच्या बहुतेक शास्त्रांवर त्याचा अनिष्ट परिणाम झाला आहे. मानवी वंशाची उपपत्ति लावणाऱ्या संशोधकांमध्यें तर ही प्रवृत्ति अधिक आहे. विविध मानवी वंशांची घडण अंधारमय इतिहासपूर्वकालांत झाली असल्यामुळें वंशशास्त्र हा विषयच मुळीं मूढ पण संमोहक वाटतो. साहजिकच या विषयाच्या अभ्यासकाला कांहीं प्रमेयें बसविण्याचा किंवा निर्णायक सिद्धांत मांडण्याचा मोह आवरत नाहीं. पण हे सिद्धांत ऐतिहासिक कसाला लावतां येत नाहींत, किंवा त्याचा गृहित पक्षही त्याला खंडन करतां येत नाहीं."

## देशस्थ–चित्पावनांच्या रांगेंत महारांचें स्थान

वरील म्हणणें लक्षांत घेतां महारांचा वंशशास्त्र दृष्टया केलेला विचार बव्हंशीं तार्किक असला तरीं सत्याकडे झुकणारा आहे. सर हरबट रिझले

यांनीं आपल्या The People of India या पुस्तकांत भारतीयांचा वंश शास्त्र दृष्टया मोठा चिकित्सक अभ्यास करून आपलीं निरीक्षणें मांडलीं आहेत. त्यांत महारांची मापेंही नमूद केलीं आहेत. मराठी विभागांत खानेसुमारी अधिकारी म्हणून काम करणारे श्री. एन्थोवेन त्यांचे महारांसंबंधीचें निरीक्षणात्मक संशोधन पाहून थक्क झाले. खानेसुमारी अधिकारी या नात्यानें संशोधनात्मक लिहिलेल्या त्यांच्या '**मुंबई प्रांतांतील जाती आणि वन्यटोळ्या**' या ग्रंथांत त्यांनीं म्हटलें आहे कीं, "सर रिझले यांनीं मराठीं लोकांची जीं मापें घेतलीं आहेत त्यानुसार हे लोक आशियांतील भटक्या टोळ्यांच्या ( Scythic ) वर्गांत मोडतात, असा त्यांचा एक वेळचा कयास होता. दक्षिण पठारावरील रूंद कपाळाचे लोक त्यांच्या पहाणींत आल्यामुळें त्यांचें हें मत झालें असावें. परंतु या प्रकारच्या प्रमाणपद्धतीनें **महाराष्ट्राचा ब्राम्हण आणि महार हे दोघेही एकाच वंशाचे** ठरूं लागल्यामुळें त्या प्रकारचें मत देतांना ह्या सिद्धांताचा खरेखोटेपणा याहूनही अधिक खात्रीच्या पुराव्यावर पडताळून पाहणें आवश्यक आहे." असें सांगून पुढें श्री. एन्थोवन म्हणतात, "डोक्याच्या ठेवणीनुसार पाडलेल्या पहिल्या वर्गांतच महारांचे स्थान खालच्या क्रमांत लागतें. मुंबई प्रांतांतील कनिष्ठ मानलेल्या जातीची खालच्या क्रमानें कां होईना पण देशस्थ, चित्पावन ब्राह्मणांच्या वर्गांत वर्णी लागावी ही सोंवळ्या वंशशास्त्रज्ञांचा गोंधळ उडविणारी गोष्ट नव्हे कां ? महारांचें वांशिक स्थान अशा अनपेक्षितपणें उच्चवर्णीयांच्या रांगेंत असावें, हें वर्णअहंकारी स्पृश्यांना कसें पटावें ? महार आणि कोळी प्राचीन काळच्या वैशिष्ठ्यपूर्ण जमाती आहेत हें अगदीं भक्कम पुराव्यांनीं सिद्ध झालें आहे. **वंशशास्त्राच्या संशोधनांत महारांची मापें ब्राह्मणांच्या जवळची किंवा देशस्थांहून उच्चतम आहेत**....रिझलेच्या संशोधन तक्त्यांवरून कांहीं निर्णायक सिद्धांत मांडावयाचा झाला तर मुंबईतील श्रेष्ठ आणि कनिष्ठ जाती

इतिहास परंपरा, चालिरिती आणि शरीररचना या सर्वदृष्टींनीं एकमेकांशीं जवळच्या आहेत." (मुंबई प्रांतांतील जाती आणि वन्यजमाती-ग्रंथ १ आवृत्ति पहिली)

वरील प्रकाराच्या प्रतिपादनामुळें पुण्याचे कर्मठ ब्राह्मण एन्थोवेन आणि रिझले साहेबांवर भडकले तर नवल नाहीं. पण सत्य कांहीं फार काळ लपवून ठेवतां येत नाहीं. संस्कृतीवर्धनाचा आणि सुसंस्कृतीचा मक्ता कांहीं ब्राह्मणांकडेच दिलेला नव्हता. **अखिल हिंदुसमाज विविध वंशांच्या रक्त मिश्रणानें झाला आहे,** हें खुद्द पंडित नेहरूंनीं आपल्या '**भारतशोध**' (Discovery of India) या ग्रंथांत सांगितले तें हिंदूनां किंवा स्वतःला उच्चवर्णीय समजणाऱ्या ब्राह्मणांना माहीत नाहीं काय? समाजशास्त्राचा सखोल अभ्यास केलेल्या महाराष्ट्रीय विदुषी डॉ. इरावती कर्वे आपल्या **मराठी लोकांची संस्कृति** या सविस्तर ग्रंथाचा शेवट करतांना म्हणतात, "कुळींच्या अभिमानामुळें व वतनदारीच्या अभिमाना-मुळ स्वयंसिद्धता व स्वातंत्र्य प्रियता हे दोन्ही गुण मराठ्यांत व त्यांच्या अनुकरणानें इतर मराठी जातींत दिसून येतात. प्रत्येक पाटील स्वतंत्र व आपल्या गांवचा राजा. त्याला शहाणपणा कोण शिकाविणार? तोच कित्ता इतर जातींनीं उचललेला आहें.......आपल्या पेक्षां वरचढ असेल त्यापुढें नमावयाचें हें बाळकडू इतर प्रांतांतील बहुजन समाजाला मिळालेलें दिसतें. या उलट, नमावयाला पाहिजे तिथें ताठ राहावयाचें ही वृत्ती सर्व मराठे जातींत दिसून येतें. त्यामुळेंच शेतकरी जमाती, कारू जमाती, महार वगैरे अस्पृश्य जमाती व ब्राह्मण जमाती या सर्वच स्वतःला फार शहाण्या समजतात व त्याप्रमाणें वर्तन करतात. ह्यामुळेंच मराठी संस्कृतींतील अंगोपांगांत या सर्वांचें कार्य दृष्टोत्पत्तीस पडतें. या संस्कृतीची निर्मिती कोणाही एका जमातीची नसून सर्वांची आहे. तिची जोपासना करावयाची असल्यास सर्वांनीं एक झालें पाहिजे."

मराठी संस्कृतीचा सत्रतासुभा स्थापून दुसऱ्यांना कमी लेखणाऱ्यांनीं वरील विचारांपासून बोध घ्यावा. सर रिझले किंवा एन्थोवेन यासारख्या सत्यवादी संशोधकांना आपल्या अहंकारामुळें दोष देण्याची जरूरी नाहीं. कारण ती वस्तुस्थिती आहे. " महारांचें महाराष्ट्रांच्या गांव-गाड्यांतील आणि राजकीय इतिहास व साहित्य निर्मिती यामध्यें जें स्थान आहे तें पाहिलें तर सर रिझले यांनीं महारांना वांशिक दृष्टया दिलेलें स्थान अगदीं अनुरूपच आहे; महारांना योग्य संधि मिळाली तर ते ब्राह्मणांपेक्षां कर्तबगारींत किंचितही कमी नाहींत,' असें प्रा. रॉबर्टसन यांनीं जें प्रतिपादिलें तें भविष्यकाळच सिद्ध करील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रभावी मार्गदर्शनाखालीं महार जमात आपल्या सर्वांगीण उद्धारासाठीं झगडत आहे. त्यांची थोर परंपरा त्यांना यश देईल यांत शंका नाहीं. इतिहासाची नेहमीं पुनरावृत्ति होतें असें म्हणतात. पुनः दीड हजार वर्षांनंतर महारांचा विकास ' भारतीय ' संज्ञेखालीं व्हावयाचा आहे. त्यांनीं आपल्या प्राचीन इतिहासाला अनुसरून बुद्धाच्या मार्गानें जाण्याचें ठरविलें आहे. ज्या समाजरचनेशीं झगडतांना गेलीं पंधरा शतकें महारांना प्रतिकूल परिस्थितींत नतमस्तक होऊन कंठावीं लागलीं ती समाजरचना बदलण्याचें सामर्थ्य त्यांना पुनः कशावरून प्राप्त होणार नाहीं ? तसें झालें तर **महाराष्ट्राचा—महार** भारतालाही ललामभूत होईल.

9043L
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
क्रमांक 29695 वि: आले
...क 820 नों: दि: 20/5/56.